CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १८ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६५ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## ई केवायसी आवश्यक

नवी दिल्ली : घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर वापरणाऱ्या ग्राहकांसाठी महत्त्वाची बातमी आहे. केंद्र सरकारने सर्व गॅस ग्राहकांना ३० जूनपर्यंत श-घधउ प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. निर्धारित मुदतीत ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास गॅस सबसिडी मिळण्यात अडचणी येऊ शकतात.सरकारच्या माहितीनुसार, गॅस सबसिडीचा लाभ केवळ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि बनावट तसेच डुप्लिकेट कनेक्शनवर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी श-घधउ अनिवार्य करण्यात आली आहे.गेल्या काही वर्षांत अनेक ग्राहकांनी आपल्या एलपीजी कनेक्शनची माहिती अद्ययावत केलेली नाही. त्यामुळे ग्राहकांची ओळख आणि कनेक्शनची पडताळणी करण्यासाठी श-घधउ प्रक्रिया राबवली जात आहे.

## अंधारेंचा आरोप

पुणे : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील संभाव्य फुटीच्या पार्श्र्वभूमीवर राज्यातील राजकारण ढवळून निघालेलं असताना ठाकरेंच्या शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी घणाघाती आरोप करत फुटण्याच्या तयारीत असणाऱ्या खासदारांचा समाचार घेतला आहे. शिवसेना खासदार फुटीच्या मोहिमेचे संजय देशमुख हे कॅप्टन असून नागेश पाटील आष्टीकर हे व्हाइस कॅप्टन आहेत, असा दावा अंधारे यांनी केला आहे.

## व्यापाऱ्याची आत्महत्या

पुणे : १६ कोटींच्या कर्जाच्या ओझ्यात दबलेल्या हिरे व्यापाऱ्याने पुण्यातील खडकवासला धरणात आयुष्य संपवल्याचा बनाव रचला. मात्र, घटनास्थळी सापडलेल्या दोन चपला वेगवेगळ्या ठिकाणी पडलेल्या असल्याची बाब पोलिसांच्या नजरेत भरली आणि त्यातून संशयाला सुरुवात झाली. याच धाग्याने तपासाला कलाटणी मिळाली आणि गूढ मृत्यूच्या कथित नाट्यामागचे रहस्य उघड झाले.संबंधित व्यापारी अचानक बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी स्वारगेट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

## भारताची चिंता वाढली

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेत कमबॅक केल्यापासून सातत्याने भारताची डोकेदुखी वाढवत आले आहेत. आधी आयातींवर ५० टक्के टॅरिफचा भार लादला तर नंतर पश्र्चिम आशियात इराणवर हल्ला करून तेलाचा पुरवठा खंडित करून भारताच्या अडचणीत भर घातली, पण इराणसोबत शांतता करार करून आता कुठं दिलासा मिळाला असताना डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताची चिंता वाढवली आहे.

## जुना फोन होणार नवा

नवी दिल्ली : अँड्रॉइड १७ च्या रोलआउटसोबत स्मार्टफोन वापरण्याचा अनुभव पूर्णपणे बदलणार आहे. या नव्या जड मध्ये कॉल मॅनेजमेंटसाठी अत्यंत उपयुक्त असलेले 'टेक अ मेसेज' आणि वैयक्तिक ऑडिओ ग्रीटिंग यांसारखे भन्नाट फीचर्स जोडण्यात आले आहेत. सुरक्षेच्या आणि सुलभतेच्या दृष्टीने हा गुगलचा आतापर्यंतचा सर्वात मोठा अपडेट मानला जात आहे.गुगलने -पवीळव १७ रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. हे आर्टिफिशियल इंटेलिजन्स अपग्रेड, कम्युनिकेशन टूल्स, सिक्युरिटी इम्प्रूव्हमेंट आणि स्मार्टवॉच फीचर्ससह आले आहे.

## जिओ वर आरोप ?

नवी दिल्ली : टेलिग्रामचे मालक पावेल ड्युरोव्ह यांनी रिलायन्स जिओवर 'इंटरनेट हायजॅकिंग'चा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या आरोपानुसार, रिलायन्स जिओने टेलिग्राम ब्लॉक करण्यासाठी 'इञ्ञ हायजॅकिंग' (ईीवशी ऋीशुरू झीीेलेश्र) या तंत्रज्ञानाचा चुकीचा वापर केला आहे. या तांत्रिक गडबडीमुळे जागतिक स्तरावरील इंटरनेट ट्रॅफिकवर परिणाम झाला असून भारताबाहेरही टेलिग्राम डाऊन झाले आहे.

# नरेंद्र मोदींचे ' ते ' शब्द खरे ठरणार !

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला २० जुलैपासून सुरुवात होणार आहे. त्यामुळे दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. तृणमूल काँग्रेस, शिवसेना उबाठामध्ये पडलेली फूट, इंडिया आघाडीपासून दुरावलेली द्रमुक यामुळे लोकसभेतील सत्ताधाऱ्यांचं संख्याबळ अचानक वाढलं आहे. भाजप प्रणित एनडीए दोन तृतीयांश बहुमताच्या जवळ पोहोचली आहे. त्यामुळे महिला आरक्षण सुधारणा विधेयक आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत पुन्हा मांडलं जाण्याची शक्यता वाढली आहे. एप्रिलमध्ये संसदेचं विशेष अधिवेशन आयोजित करण्यात आलं होतं. त्यामध्ये महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित घटना दुरुस्ती विधेयक नामंजूर झालं. त्यावेळी विधेयकाच्या बाजूनं २९८ मतं, तर विरोधात २३० मतं पडली. विधेयक मंजूर होण्यासाठी ३५२ मतं गरजेची होती. सरकारला तेव्हा ५४ मतं कमी पडली. आज आमच्याकडे आकडा नाही, पण याचा अर्थ असा नाही की आम्ही हरलो. पुढे आणखी संधी येतील, असं विधान तेव्हा पंतप्रधान मोदी यांनी केलं होतं. मोदींचे हे शब्द पावसाळी अधिवेशनात खरे ठरण्याची दाट शक्यता आहे.१७ एप्रिल २०२६ रोजी विधेयक नामंजूर झालं. यानंतर आता बरोबर २ महिन्यांनी शिवसेना उबाठात फूट पडली आहे. १७ जूनला ठाकरेसेनेचे ६ खासदार फुटले. ते सत्ताधारी बाकांवर जाणार असल्यानं एनडीएचं संख्याबळ वाढेल. त्याआधी तृणमूल काँग्रेसचे २८ पैकी २० खासदार फुटले आहेत. त्यांचा गटदेखील एनडीएला पाठिंबा देणार आहे. ठाकरेसेना आणि तृणमूलच्या फुटीर खासदारांमुळे एनडीएचा लोकसभेतील आकडा २८ नं वाढून ३२४ वर जाईल.दुसरीकडे भाजपची नजर तमिळनाडूवर आहे. काँग्रेसनं विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत जाण्यासाठी द्रमुक सोबतची युती तोडली.



यानंतर द्रमुकनं लोकसभेत काँग्रेसच्या खासदारांसोबत बसायचं नाही, अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे. इंडिया आघाडीला तडे जात आहेत. पण द्रमुकनं एनडीएसोबत जाण्याचे संकेत दिलेले नाहीत. त्यांचे लोकसभेत २२ खासदार आहेत.

द्रमुक सोबत आल्यास एनडीएचा आकडा थेट ३४६ वर जातो. लोकसभेची ५४० सदस्य संख्या पाहता दोन तृतीयांशसाठी ३६० खासदारांचा पाठिंबा गरजेचा आहे. त्यामुळे एनडीएला आणखी १४ खासदारांची गरज भासेल.एका भाजप खासदारानं महत्त्वाचं गणित मांडलं. मागील वेळी लोकसभेत मतदानावेळी १२ खासदार गैरहजर राहिले होते. त्यामुळे १४ खासदार अनुपस्थित राहिले किंवा त्यांनी तटस्थ राहण्याची भूमिका घेतल्यास दोन तृतीयांशचा आकडा गाठला जाऊ शकतो. अशा स्थितीत लहान पक्ष मोठी भूमिका बजावू शकतात. त्यासाठीची तयारी भाजपनं आतापासूनच सुरू केली आहे.

# पंचांगानुसार मान्सूनचा अंदाज
## जुलैमध्ये मुसळधार पावसाची शक्यता



पुणे : सोळा निकषांच्या आधारे, अत्याधुनिक यंत्रणा वापरून हवामान शास्त्रज्ञांनी जूनमध्ये खंड पडेल आणि जुलैमध्ये चांगला पाऊस होईल, असा अंदाज व्यक्त केला होता. आश्र्चर्याची बाब म्हणजे, गेल्या वर्षी तयार झालेल्या पंचांगांनी हेच भाकित अचूकपणे तयार केले आहे.भारतीय पंचांगात यंदा राज्यात २० जूनपर्यंत कमी पावसाचे अंदाज वर्तविण्यात आले आहेत. मात्र, २२ जून ते ४ नोव्हेंबरपर्यंत चांगल्या पावसाचे अंदाज वर्तविले आहेत.

यंदा पावसाचे दिवस कमी, खंड जास्त, असे स्वरूप राहील. सर्वच नक्षत्रांत पुरेसा पाऊस पडेल, असा दावा पंचांगकर्त्यांनी केला आहे. राज्यातील सर्वच प्रमुख पंचांगांत त्या त्या वर्षीचा नक्षत्रनिहाय पर्जन्यविचार दिलेला असतो. तसाच सर्वच पंचांगांत यंदा दिलेला आहे. चंद्राच्या कक्षा भ्रमणाचा काल घटका, पळे आणि तिथी याप्रमाणे सुमारे ८०० कलांचे गणित करून हे अंदाज दिले जातात. एकूण २७ नक्षत्रे आहेत. त्यातील पर्जन्याची नक्षत्रे निवडून त्यांचे अंदाज मांडण्यात आले आहेत.

# राजधानीत दहशतवादी कट उधळला!

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा दहशतवादी कारवायांच्या सावटाखाली आल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय समर्थित असल्याचा संशय असलेल्या एका मोठ्या नेटवर्कचा दिल्ली पोलिसांनी पर्दाफाश केला असून शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या ईस्टर्न रेंज पथकाने ही मोठी कारवाई करत संभाव्य दहशतवादी कट हाणून पाडला.



प्राथमिक तपासात अटक करण्यात आलेल्या आरोपींचे संबंध पाकिस्तानातील कुख्यात गँगस्टर ते दहशतवादी बनलेल्या शहजाद भट्टी आणि त्याचा सहकारी अजमल गुजर यांच्या नेटवर्कशी असल्याचे उघड झाले आहे.हे नेटवर्क केवळ अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची तस्करी करत नव्हते, तर दिल्ली-एनसीआर परिसरात दहशतवादी कारवायांसाठी आवश्यक माहिती गोळा करणे आणि संभाव्य लक्ष्यांवर पाळत ठेवण्याचे कामही करत असल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. तपासादरम्यान धक्कादायक बाब समोर आली असून पाकिस्तानातून पंजाब सीमेमार्गे भारतात हेरॉईनसह इतर अमली पदार्थ आणि अत्याधुनिक शस्त्रे पाठवली जात होती. त्यानंतर ही सामग्री दिल्ली, नोएडा, गाझियाबाद, गुरुग्रामसह एनसीआर परिसरात पुरवली जात होती. या रॅकेटमधून मिळणारा पैसा दहशतवादी कारवायांसाठी वापरला जात असल्याचाही संशय आहे.

दिल्ली पोलिसांनी आरोपींकडून महत्त्वाचे पुरावे, डिजिटल उपकरणे आणि काही संशयास्पद कागदपत्रे जप्त केली आहेत. या माध्यमातून आयएसआयशी संबंधित संपर्क, आर्थिक व्यवहार आणि नेटवर्कमधील इतर सदस्यांची माहिती मिळण्याची शक्यता आहे. तपास यंत्रणा आता या प्रकरणातील आंतरराष्ट्रीय दुवे शोधत असून देशातील इतर राज्यांमध्येही या टोळीचे जाळे पसरले आहे का, याचाही तपास सुरू आहे.

# ठाकरे सेनेनंतर आणखी एक पक्ष फुटणार ?

वृत्तसंस्था

लखनऊ : उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत पुन्हा एकदा फूट पडली आहे. लोकसभेतील ठाकरेसेनेचे ६ खासदार फुटून शिंदेसेनेत गेले आहेत. चार वर्षांत ठाकरेंचा पक्ष दुसऱ्यांदा फुटला आहे. तर पश्र्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचे २८ पैकी २० खासदार फुटले आहेत. त्यांनी आपला गट एनसीपीआय पक्षात विलीन केला आहे. त्यानंतर आता आणखी एक मोठा पक्ष फुटेल, असा दावा कॅबिनेट मंत्र्यानं केला आहे. सुहेलदेव भारतीय समाज पक्षाचे प्रमुख आणि उत्तर प्रदेश सरकाररमध्ये मंत्री असलेल्या ओमप्रकाश राजभर यांच्या दाव्यानं राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. समाजवादी पक्ष ात लवकरच मोठी फूट पडणार असल्याचा दावा त्यांनी केला. 'समाजवादी पक्षात मोठी फूट पडेल. रामगोपाल यादव यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे एक पत्र दिलं आहे. खाण घोटाळा आणि गोमती रिव्हर फ्रंट घोटाळ्याचा मास्टरमाईंड कोण आहे, हे संपूर्ण राज्याला माहीत आहे. आता फास आवळला जातोय. त्यामुळे समाजवादी पक्ष त्रस्त आहे,' अशी पोस्ट राजभर यांनी केली आहे.'महाराष्ट्र,बंगालसोडा. संपूर्ण समाजवादी पक्ष भाजपमध्ये सामील होण्यास तयार आहे,' असं राजभर यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. उत्तर प्रदेशात पुढील वर्षी विधानसभेची निवडणूक आहे. त्याआधी समाजवादी पक्षात फूट पडल्यास विरोधी पक्षांच्या आघाडीला मोठा धक्का बसू शकतो. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षानं भाजपला दणका देत ३७ जागा जिंकल्या होत्या. तर भाजपला ३३ जागांवर समाधान मानावं लागलं होतं. भाजपच्या २८ जागा कमी झाल्या होत्या. तर समाजवादी पक्षाच्या ३२ जागा वाढल्या होत्या.'महाराष्ट्र, बंगाल सोडा. समाजवादी पक्षातील बरेच नेते भाजपमध्ये जातील. ईडीच्या कारवाईनं सपाचं नेतृत्व त्रस्त आहे. त्यामुळे पक्षात अस्वस्थता वाढली आहे,' असा दावा त्यांनी केला. राज्यातील एनडीए सरकारमध्ये मंत्री असलेले राजभर गेल्या अनेक महिन्यांपासून समाजवादी पक्षावर सातत्यानं शाब्दिक हल्ले चढवत आहे. राजभर यांच्या दाव्यानं आणि वक्तव्यांनी राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. यावर समाजवादी पक्षाकडून अद्याप तरी कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. राजभर यांनी याआधी रामगोपाल यादव यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. प्रतीक यादव यांच्या निधनानंतर रामगोपाल अपर्णा यांच्या घरीदेखील गेले नव्हते, असा दावा राजभर यांनी केला होता.



# कन्नड शहर पोलिसांची धडाकेबाज कारवाई; घरातून २.२३ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त
## अन्न व औषध प्रशासनावर प्रश्नचिन्ह ?

तभा वृत्तसेवा

कन्नड : कन्नड शहर पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या धाडीत करीमनगर गल्ली नं ९ परिसरातील एका घरातून सुमारे २ लाख २३ हजार ४५० किमतीचा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा बुधवार रोजी जप्त केला. या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या अवैध गुटखा साठवणुकीचा पर्दाफाश झाला असून, अन्न व औषध प्रशासनाच्या देखरेखीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलिसांनी समीर शेख चाँद यांच्या राहत्या घरी छापा टाकून झडती घेतली असता विविध ब्रँडचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आला.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात विमल पान मसाला, व्ही-१ तंबाखू तसेच अन्य प्रतिबंधित उत्पादनांचा समावेश असून त्याची एकूण किंमत २,२३,४५० इतकी आहे.

विशेष म्हणजे, राज्यात विक्रीस बंदी असलेला हा माल शहरात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आला होता. त्यामुळे अशा अवैध साठ्याची माहिती संबंधित यंत्रणांना कशी मिळाली नाही? शहरात गुटख्याचा पुरवठा नेमका कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? असे प्रश्न उपस्थित होत आहेत.




ही कारवाई पोलिस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सतीश दिंडे, सहाय्यक फौजदार नासिर पठाण, पोलिस नाईक प्रवीण बर्डे, पोलिस अंमलदार सागर सुलाने आणि प्रदीप चव्हाण यांच्या पथकाने केली.

जप्त केलेला मुद्देमाल पुढील तपासासाठी अन्न व औषध प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आला असून, संबंधितांविरुद्ध नियमानुसार पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## सोने - चांदी तेजीत



नवी दिल्ली :अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराबाबत सकारात्मक घडामोडींनंतर अमेरिकेच्या फेड रिझर्व्हकडून व्याजदर वाढवण्याच्या अपेक्षा मावळल्याने सोन्याच्या दरातील वाढ सलग पाचव्या सत्रातही कायम राहिली, त्याचवेळी गुंतवणूकदार या कराराबाबत अधिक तपशीलांकडे लक्ष ठेवून असल्यामुळे दोन्ही मौल्यवान धातूंमधील वाढ मर्यादित राहिली.

# उभ्या ट्रकला लक्झरी बसची जोरदार धडक;६ जणांचा जागीच मृत्यू, २६ प्रवासी जखमी

वृत्तसंस्था

वडोदरा : गुजरात राज्याला हादरवून सोडणारी एक अत्यंत हृदयद्रावक आणि भीषण अपघाताची घटना बुधवारी पहाटे घडली आहे. वडोदरा-हालोल महामार्गावर भरधाव वेगात असलेल्या एका खाजगी लक्झरी बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला मागून जोरदार धडक दिल्याने हा अनर्थ ओढवला. या दुर्दैवी घटनेत ६ प्रवाशांचा जागीच करुण अंत झाला असून, २६ जण गंभीर जखमी झाले आहेत. कोतांबी गावाजवळ घडलेल्या या अपघाताने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ही खासगी ट्रॅव्हल्सची लक्झरी बस राजस्थानमधील बांसवाडा येथून गुजरातच्या सुरत शहराकडे प्रवाशांना घेऊन जात होती.






बुधवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास सर्व प्रवासी गाढ झोपेत असताना बस कोतांबी स्टेडियमजवळ पोहोचली. याच दरम्यान महामार्गावर एका ट्रक चालकाने आपल्या वाहनाच्या टायरमधील हवेचा दाब (टायर प्रेशर) तपासण्यासाठी आपला ट्रक रस्त्याच्या कडेला उभा केला होता. पहाटेचा अंधार आणि बसचा प्रचंड वेग यामुळे बस चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव बस थेट उभ्या असलेल्या ट्रकच्या मागच्या भागावर जाऊन आदळली. ही धडक इतकी भयंकर होती की बसच्या समोरील भागाचा अक्षरशः चुराडा झाला आणि झोपेत असलेले प्रवासी सीटसह आतच अडकून पडले.पहाटेच्या शांततेत झालेला अपघाताचा भीषण आवाज ऐकून आजूबाजूच्या स्थानिक नागरिकांनी आणि महामार्गावरून जाणाऱ्या इतर वाहनचालकांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली. घटनेची माहिती पोलिसांना मिळताच वडोदरा अग्निशमन दल, पाणीगेट अग्निशमन केंद्र आणि आपत्कालीन प्रतिसाद दलाच्या तुकड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. परिस्थिती अत्यंत गंभीर आणि गुंतागुंतीची असल्याने राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाला देखील पाचारण करण्यात आले.

दोन्ही वाहने एकमेकांत इतकी भयंकर रित्या अडकली होती की ती वेगळी करण्यासाठी क्रेन आणि जेसीबी मशीनचा वापर करण्यात आला. त्यानंतर, गॅस कटरच्या साहाय्याने बसचे पत्रे कापून आत अडकलेल्या आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या प्रवाशांना मोठ्या शर्थीने बाहेर काढण्यात आले.या दुर्घटनेत एकूण २६ प्रवासी जखमी झाल्याची पुष्टी प्रशासनाकडून करण्यात आली आहे. बचाव कार्यातून बाहेर काढलेल्या सर्व जखमींना तातडीने वडोदरा येथील शासकीय (सिव्हिल) रुग्णालय तसेच जवळच्या खाजगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींपैकी किमान पाच प्रवाशांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात शर्थीचे उपचार सुरू आहेत. या बसमधील बहुतांश प्रवासी हे मूळचे राजस्थानचे रहिवासी असल्याचे समोर आले असून, प्रशासनाकडून मृतांच्या आणि जखमींच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सीमेन्सला टिटागढ रेल सिस्टिम्स लिमिटेडकडून महत्त्वपूर्ण ऑर्डर प्राप्त

मुंबई - सीमेन्स लिमिटेडला टिटागढ रेल सिस्टिम्स लिमिटेडकडून पुणे मेट्रो रेल्वे विस्तार प्रकल्पासाठी अत्याधुनिक प्रोपल्शन प्रणाली आणि ट्रेन कंट्रोल अँड मॉनिटरिंग सिस्टीम (टीसीएमएस) पुरविण्याची ऑर्डर प्राप्त झाली आहे. या कंत्राटाअंतर्गत 12 मेट्रो ट्रेनसेट्ससाठी ट्रॅक्शन कन्व्हर्टर्स, ऑक्झिलरी कन्व्हर्टर्स, ट्रॅक्शन मोटर्स आणि टीसीएमएस यांचे डिझाइन, उत्पादन, पुरवठा तसेच वॉरंटी सेवा पुरविण्याची जबाबदारी सीमेन्स लिमिटेडकडे सोपविण्यात आली आहे. या अत्याधुनिक प्रणालींमुळे पुणे मेट्रोच्या विस्तार प्रकल्पातील रेल्वे सेवांची कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि सुरक्षितता अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.सीमेन्स लिमिटेडच्या मोबिलिटी बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी, राजीव जोईसर म्हणाले, "पुणे मेट्रो प्रकल्पासाठी टिटागढ रेल सिस्टिम्स लिमिटेडसोबत भागीदारी करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. भारतातील वेगाने विस्तारत असलेल्या मेट्रो क्षेत्रासाठी अत्याधुनिक प्रोपल्शन आणि ट्रेन कंट्रोल अँड मॅनेजमेंट सिस्टम (टीसीएमएस) तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याच्या आमच्या प्रवासातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

## क्रिस्पी टेक्शचरसोबत आता दुधाच्या चवीची मजा

मुंबई - ब्रिटानियाने नव्या दूध मारी गोल्डसह आपल्या मारी उत्पादनांमध्ये नवी भर घातली आहे. मैद्याचा अजिबात वापर न करता पूर्णपणे फक्त पिठापासून बनलेल्या या नव्या बिस्किटांमध्ये मारी बिस्किटांमधील मूळ हलके आणि क्रिस्पी टेक्श्चर कायम राखत त्यात दुधाच्या चवीची जोड देण्यात आली आहे.दूध मारी गोल्डमध्ये एक अनोखी चव आणि मारी बिस्किटांची ओळख असलेली वैशिष्ट्ये यांचा सुंदर मेळ आहे. त्यामुळे, याच उत्पादनवर्गात ग्राहकांना एक अनोखा आणि नवा अनुभव मिळतो. चव आणि टेक्श्चर यांचा समतोल साधत या नव्या बिस्किटात ब्रिटानियाने ग्राहकांच्या बदलत्या आवडींनुसार नाविन्यतेवर भर दिला आहे. त्याचप्रमाणे ग्राहकांच्या आवडीच्या हलक्या आणि क्रिस्पी मारी बिस्किटांमध्ये दुधाची मस्त चवही दिली आहे.या नव्या उत्पादनाला दणक्यात सादर करण्यासाठी ब्रिटानियाने नवी जाहिरातही केली आहे. यात अगदी सहजसोप्या पद्धतीने दूध मारी गोल्डमधील हलकं, क्रीमी टेक्श्चर आणि दुधाच्या चवीचा अनुभव यांची सांगड घालण्यात आली आहे. नेहमीच्या चहाच्या वेळी घडणाऱ्या या जाहिरातीत चहासोबत दुधाच्या बिस्किटांचा अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांवर भर देण्यात आला आहे.

## क्रिझॅकची फॉरेनअ‍ॅडमिट्ससोबत भागीदारी

**पुणे :** भारतातील अग्रगण्य तंत्रज्ञान-आधारित आंतरराष्ट्रीय विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या क्रिझॅक लिमिटेडने आज एज्युमेंट कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेडमध्ये धोरणात्मक गुंतवणुकीची घोषणा केली. ही कंपनी फॉरेनऍडमिट्स या एआय-आधारित विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्मची संचालक आहे, जिने 100,000 हून अधिक विद्यार्थ्यांना सेवा दिली आहे आणि ₹1,500 कोटींहून अधिक किमतीच्या शैक्षणिक कर्जांची सोय केली आहे. कंपलसरी कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (सीसीडी) आणि कंपल्सरी कन्व्हर्टिबल प्रेफरन्स शेअर्स (सीसीपीएस) द्वारे केलेली ही गुंतवणूक, तंत्रज्ञान-आधारित, संपूर्ण विद्यार्थी गतिशीलता प्लॅटफॉर्म म्हणून क्रिझॅकच्या सातत्यपूर्ण वाढीमधील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे, ज्यामुळे, विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांना सेवा देणाऱ्या एआय-आधारित वित्तपुरवठा आणि व्हिसा सोल्यूशन्ससह क्रिझॅक आपल्या पोहोचचा विस्तार करत आहे.

## आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडियाने प्रस्तुत केले झॅगनेलीस प्रोटेक्ट

**नवी दिल्ली :** आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया ने आज 'झॅगनेलीस® प्रोटेक्ट' ची प्रस्तुती करण्याची घोषणा केली. हे उच्च-कार्यक्षमता असलेले ऑटोमोटिव्हसाठी डिझाइन केलेले प्रीमियम झिंक-अ‍ॅल्युमिनियम-मॅग्नेशियम कोटेड स्टील आहे. युरोपियन बाजारपेठेत यशस्वी ठरलेले आर्सेलरमित्तलचे पेटंट मिळालेले झॅगनेलीस® प्रोटेक्ट कोटिंग्स, जगातील तिसऱ्या क्रमांकाच्या सर्वात मोठ्या ऑटोमोटिव्ह उत्पादक देश असलेल्या भारतात अशा प्रकारची पहिलीच उत्पादन क्षमता घेऊन आले आहे. आतापर्यंत, या दर्जाचे आणि अशा तंत्रज्ञानाचे स्टील पूर्णपणे आयात केले जात होते. प्रमुख ग्राहकांच्या उपस्थितीत चेन्नईमध्ये झालेल्या या प्रस्तुतीसह, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया ऑटोमोटिव्हसाठी उच्च दर्जाचे, प्रीमियम झिंक-अ‍ॅल्युमिनियम-मॅग्नेशियम कोटेड स्टील आणणारी पहिली कंपनी बनली आहे, ज्यामुळे तिचे तंत्रज्ञानातील नेतृत्व अधिक मजबूत झाले आहे.

## छत्रपती संभाजीनगरच्या कन्येची राष्ट्रीय डिझाईन संस्थेत निवड



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहरासाठी अभिमानाची बाब म्हणजे मेघना महेश दिग्रसकर हिची देशातील प्रतिष्ठित नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (NID) च्या एम.डेस. (M.Des.) अभ्यासक्रमातील Transportation & Automobile Design या शाखेसाठी गांधीनगर कॅम्पसमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी निवड झाली आहे.

राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत चुरशीच्या असलेल्या स्पर्धात्मक प्रवेश प्रक्रियेत उल्लेखनीय यश मिळवत मेघनाने ही मानाची संधी प्राप्त केली आहे. तिच्या या यशामुळे छत्रपती संभाजीनगरचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले आहे.Transportation & Automobile Design ही NID मधील अत्यंत प्रतिष्ठित आणि आधुनिक शाखा असून या क्षेत्रात वाहन डिझाईन, भविष्यकालीन वाहतूक व्यवस्था आणि नाविन्यपूर्ण मोबिलिटी सोल्युशन्स विकसित करण्याचे शिक्षण दिले जाते.

# महामार्ग पोलिसांच्या सतर्कतेने संशयास्पद वाहन अडवले; एक महिन्याच्या बाळासह महिला ताब्यात





**तभा वृत्तसेवा**

**कन्नड :दि.१७ जून -** चाळीसगाव घाट परिसरात गस्तीदरम्यान संशयास्पदरीत्या फिरत असलेले विना क्रमांकाची चार चाकी वाहन महामार्ग पोलिसांनी अडवून तपासणी केली. या कारवाईत बीड शहरातून बेपत्ता झालेली महिला, तिच्यासोबत एक पुरुष आणि एक महिन्याचे बालक आढळून आले.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजेच्या सुमारास चाळीसगाव घाटात पोलीस हेडकॉन्स्टेबल सागर पाटील ड्युटीवर असताना विना क्रमांकाचे वाहन संशयास्पदरीत्या दिसून आले. वाहन थांबविल्यानंतर आत असलेल्या व्यक्तींनी काळ्या काचा खाली करण्यास टाळाटाळ केल्याने संशय अधिक बळावला. यानंतर त्यांनी तातडीने पोलीस यंत्रणेला माहिती दिली.

माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक नितेश इंद्रोले सह महामार्ग पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. चौकशीदरम्यान वाहनात अक्षय रेडे (वय ३१, रा. ठाकरे नगर, बीड) आणि कोमल मनोत (वय २९, रा. उत्तमनगर, बीड) हे एक महिन्याच्या बालकासह आढळून आले.सदर कारवाई महामार्ग पोलिस केंद्र आलापूर पोलिस उपनिरीक्षक नितेश इंद्रोले, पोलिस हेडकॉन्स्टेबल सागर पाटील,आर.भुसारे,झिरो पोलिस शांताराम सोनवणे, किसन राठोड यांनी केली

संशयास्पद हालचालींमुळे दोघांनाही पुढील चौकशीसाठी कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तपासादरम्यान संबंधित महिलेबाबत बीड शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची नोंद असल्याचे समोर आले. पुढील आवश्यक कारवाईसाठी बीड पोलिसांचे पथक कन्नडकडे रवाना झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# मुंबईत राष्ट्रीय गुणगौरव पुरस्काराने डॉ. सदाशिव पाटील सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. १७ :** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेत बी. द. चेंज फाउंडेशनच्या वतीने मुंबई येथे आयोजित राष्ट्रीय गुणगौरव पुरस्कार सोहळा २०२६ मध्ये कन्नडचे माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांना राष्ट्रीय गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सोहळा आरंभ हॉल येथे पार पडला.

देशभरातील विविध राज्यांतील सामाजिक, शैक्षणिक व इतर क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला. त्यामध्ये डॉ. सदाशिव पाटील यांच्या कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या या सन्मानामुळे कन्नडच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पाटील यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीय, सहकारी, मित्र, शुभचिंतक आणि समाजातील सर्व घटकांना समर्पित करत भविष्यातही समाजोपयोगी कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. विशेष म्हणजे, यापूर्वी १७ मे रोजी शिर्डी येथे बी. द. चेंज फाउंडेशनच्या वतीने त्यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव पुरस्कार देखील प्रदान करण्यात आला होता. अल्पावधीत मिळालेल्या या दोन सन्मानांमुळे त्यांच्या सामाजिक कार्याची व्यापक पातळीवर दखल घेतली जात असल्याचे बोलले जात आहे.

## बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लू माउंटेन प्री स्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**बिडकीन, दि. १७ जून :** बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लू माउंटेन प्री स्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून तसेच शुभेच्छा देऊन त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची आनंददायी सुरुवात करण्यात आली. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला तसेच मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे हसतमुखाने स्वागत करत त्यांच्यात उत्साह निर्माण केला. शाळेचा पहिला दिवस संस्मरणीय ठरावा यासाठी संपूर्ण शाळा आकर्षक फुगे, रंगीबेरंगी सजावट, स्वागत फलक आणि विविध शैक्षणिक संदेशांनी सजविण्यात आली होती. शाळेच्या सुंदर व आनंददायी वातावरणामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, नवीन मित्रांना भेटण्याची उत्सुकता आणि शिक्षकांच्या प्रेमळ स्वागतामुळे शाळेचा परिसर चैतन्यमय झाला होता. विद्यार्थ्यांनीही नव्या जोमाने आणि आत्मविश्वासाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात केली. यावेळी संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच संस्कार, शिस्त आणि सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले. मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती, अभ्यास आणि विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत नवीन शैक्षणिक वर्षाचा शुभारंभ उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात संपन्न झाला.

# गुलमंडी चौकातील डीपी स्थलांतरासाठी हालचाली; स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांची प्रत्यक्ष पाहणी



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील गजबजलेल्या गुलमंडी चौकात वाहतुकीस अडथळा ठरत असलेल्या विद्युत पुरवठा केंद्र (डीपी) संदर्भात स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

गेल्या अनेक वर्षांपासून चौकाच्या मध्यभागी असलेली ही डीपी वाहतूक कोंडी तसेच नागरिकांच्या दैनंदिन हालचालींसाठी अडचणीची ठरत आहे. विशेषतः पादचारी आणि वाहनचालकांना यामुळे मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत होत्या.

पाहणीदरम्यान रस्त्यात अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब तातडीने हटविण्यासह परिसरातील सर्व विद्युत केबल भूमिगत करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यामुळे वाहतुकीचा मार्ग अधिक मोकळा होण्यासोबतच परिसराचे सौंदर्यीकरण आणि सुरक्षितता वाढण्यास मदत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर मकरिये यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून डीपीचे तातडीने स्थलांतर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्याच्या सूचनाही दिल्या. डीपी स्थलांतरित झाल्यानंतर वाहतुकीचा प्रवाह सुरळीत होण्यास, कोंडी कमी होण्यास आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेत वाढ होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासह मूलभूत सुविधा अधिक सक्षम आणि सुकर करण्यासाठी महापालिका प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# बिडकीनच्या औद्योगिक प्रगतीचा केंद्रीय राज्यमंत्र्यांकडून आढावा



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विकास व विश्वास पर्वानिमित्त केंद्रीय राज्यमंत्री सौ. निमुबेन बांभाणिया यांनी मंगळवारी बिडकीन येथील वेगाने विकसित होत असलेल्या औद्योगिक क्षेत्राला भेट देत JSW, Toyota, Ather आणि Endurance या प्रमुख प्रकल्पांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष किशोर शितोळे, नगरसेवक रामेश्वर भादवे, सौ. छाया खाजेकर, माजी नगरसेवक दिलीप थोरात तसेच मंडळ अध्यक्ष निखिल महाले उपस्थित होते. संबंधित प्रकल्पांच्या अधिकाऱ्यांनी उद्योगांच्या उभारणीची सद्यस्थिती, उत्पादन क्षमता, भविष्यातील विस्तार आणि स्थानिक युवकांसाठी उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधींची माहिती दिली.

बिडकीन परिसर मराठवाड्याच्या औद्योगिक नकाशावर वेगाने उदयास येत असून केंद्र सरकारच्या उद्योगपूरक धोरणांमुळे मोठ्या गुंतवणुकीला चालना मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या भेटीद्वारे औद्योगिक विकासाला गती देतानाच स्थानिक रोजगारनिर्मिती आणि आर्थिक प्रगतीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

## 'द महाराष्ट्र फाईल' चित्रपटावरुन नवा वाद; मराठा क्रांती मोर्चाची सेन्सॉर बोर्ड आणि मुख्यमंत्र्यांकडे धाव



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) – राज्यभरात चर्चेचा विषय ठरलेल्या आणि अनेक ठिकाणी प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असलेल्या 'द महाराष्ट्र फाईल' या चित्रपटाभोवती आता नव्या वादाचे वलय निर्माण झाले आहे. चित्रपटामध्ये मराठा समाजाचा उल्लेख कथितपणे 'छोटा मराठा' असा करण्यात आल्याचा आरोप करत 'मराठा क्रांती मोर्चा'ने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात सेन्सॉर बोर्ड तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली असून चित्रपटावरील आक्षेपार्ह भाग हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मराठा समाज हा महाराष्ट्राच्या सामाजिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक आहे. अशा समाजाचा उल्लेख कोणत्याही चित्रपटात कमीपणा दर्शविणाऱ्या शब्दांत होणे समाजाच्या भावना दुखावणारे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

# शासकीय कर्करोग रुग्णालयात 43 दात्यांचे रक्तदान; महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना व कॅनकीडस किडसस्कॅन फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य कर्करोग संस्था अर्थात शासकीय कर्करोग रुग्णालय येथे दररोज हजारो रुग्ण येतात. दाखल झालेल्या रुग्णांना दररोज रक्ताची गरज पडते. यादरम्यान घाटीतील विभागीय रक्तपेढी कर्करोग रुग्णालयास रक्तपुरवठा करते. हा तुटवडा लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना मुख्यालय लातूर, शाखा शासकीय कर्करोग रुग्णालय व कॅनकीडस किडसस्कॅन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबीर आयोजित केले असता 43 दात्यांनी सहभाग घेतला.

जागतिक रक्तदान दिनानिमित्त बालकर्करोग रुग्णासाठी शासकीय कर्करोग रुग्णालय येथे रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबीराच्या अध्यक्षस्थानी घाटीचे डॉ. शिवाजी सुक्रे हे होते. संघटना नेहमीच रुग्णहिताचे तसेच राज्यातील परिचारिकांच्या कल्याणार्थ सनदशीर मार्गाने काम करत असते. याचबरोबर विविध मार्गाने सामाजिक हित जोपासण्याचे ही कार्य करत असते. कॅनकीडस किडसस्कॅन फाऊंडेशन ही भारतातील बाल कर्करोगासाठी राष्ट्रीय सोसायटी फॉर चेंज आहे. जी बालपण कर्करोगाच्या काळजीच्या संपूर्ण क्षेत्रात काम करते. मुलांना व त्यांच्या कुटुंबाला समग्र आधार देण्याचे कार्य करते. बालकर्करोग रुग्ण वय वर्ष ० ते १९ वयोगटातील रुग्णासाठी काम करत असते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे व इतर पाहुण्यांचे स्वागत बालरुग्णांनी कागदांपासून तयार केलेले पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी अधिष्ठाता सुक्रे यांनी संबधित बालरुग्णांचे गोड शब्दांनी कौतुक करून हे कागदी पुष्पगुच्छ कार्यालयात जपून ठेवील असे आश्वासित केले. कार्यक्रमाची प्रस्तावना संघटनेचे राज्य सदस्य महेंद्र बनसोडे यांनी सादर केली तर सूत्रसंचालन शुभांगी गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी शासकीय कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांनी रक्तदान शिबीर आयोजकांचे कौतुक करून पुढील काळात असे उपक्रम राबविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिबिरासाठी डॉ. दर्पण जक्कल, डॉ. अजय बोराळकर, डॉ. बालाजी शेवाळकर, डॉ अंजली वासाडीकर, डॉ. फारुकी अझीझ, डॉ सुयोग नागरे, अधिसेविका मंदाकिनी ठोकळ, मोसिन कादरी, भारत वाणी, कॅनकीडस किडसस्कॅन फाऊंडेशनच्या वर्षा पवार, मुस्कान सय्यद, मिनाक्षी वसावे व कर्मचारी सहभागी होते. रक्तदात्यांचे विशेष आभार स्वप्नाली शिंदे व जानवी सावंत या रुग्णांनी केले.

# जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा, सोयगाव येथे भव्य शाळा प्रवेशोत्सव संपन्न



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.१६ जून :** सोयगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित करण्यात आलेला भव्य शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात,आनंदात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रवेशोत्सव रॅली,शैक्षणिक साहित्य वितरण,पालक मार्गदर्शन तसेच वृक्षारोपण अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली. या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले.त्यांच्यासह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सारिका लाडगे,पंचायत समिती सभापती उत्तम राठोड,पंचायत समिती सदस्य राहुल राठोड, गटविकास अधिकारी अमोल जगताप,गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रविंद्र काळे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भागवत गायकवाड तसेच सदस्य राजेंद्र दुतोंडे,रविंद्र साखळे,अण्णा वाघ उपस्थित होते.

तसेच सोयगाव पोलीस स्टेशनचे नारायण जिरी,राजू सोनवणे,आगार प्रमुख मनीष जवळेकर,अण्णासाहेब ढेपले, संतोष पाखरे आणि मधुकर आमटे यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. शाळा प्रवेशोत्सव रॅलीद्वारे शिक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यात आले.विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले तसेच पालक मार्गदर्शन व संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही यावेळी देण्यात आली.

यावेळी पुष्पाताई काळे यांच्या हस्ते दोन वृक्षांची लागवड करण्यात आली.त्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी शाळा परिसर, वर्गखोल्या,शैक्षणिक सुविधा तसेच विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांची पाहणी केली.विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या गुणवत्तेचे,कलागुणांचे व आत्मविश्वासाचे मनापासून कौतुक केले. शाळेतील स्वच्छता,शिस्त आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण पाहून सर्व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. तसेच शाळेच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचेही कौतुक करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सुरेखा चौधरी,महाकाळ मॅडम,प्रतिभा कोळी,सविता पाटील,गणेश बाविस्कर,अकुश काळे,मंगला बोरसे,मंदा म्हस्के,पांडुरंग बारगजे,पूनम कल्याणकर,शुभम देसले,शेख विकार आणि बागवान सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. विद्यार्थीकेंद्रित उपक्रम,गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न प्रेरणादायी आहेत. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनामुळे शाळेची ओळख तालुक्यात एक आदर्श शाळा म्हणून निर्माण होत असून उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

मुख्याध्यापक, शिक्षक वृंद,शालेय व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ,पालक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्यामुळे हा शाळा प्रवेशोत्सव अत्यंत यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांचा उत्साह,पालकांचा सहभाग आणि मान्यवरांचे मार्गदर्शन यामुळे नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रेरणादायी वातावरणात झाली.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विद्यार्थ्यांची उपस्थिती 'चॅट बॉट'वर होणार

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती ऑनलाईन नोंदविण्याबाबत 'चॅट बॉट' सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. विद्या समीक्षा केंद्र, पुणेमार्फत 'चॅटबॉट' च्या वापरासंदर्भात विभाग, तालुका व कंद्रस्तरापर्यंत सर्व शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानीत, अंशतः अनुदानित शाळांतील इयत्ता पहिली ते १० वीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती अटेंडन्स बॉटद्वारे ऑनलाईन पद्धतीने नोंदविण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

मुख्याध्यापक, शिक्षकांना ऑनलाईन विद्यार्थी उपस्थिती नोंदविण्यासाठी आदेशित करावे, तसेच सदर विद्यार्थी उपस्थिती नियमितपणे नोंदविली जात असल्याची खात्री करावी, असे १४ जून २०२६ रोजीच्या परिपत्रकात म्हटले आहे.



## विविध वृत्त...

### मनपाने उपाय योजना कराव्यात

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : शहरातील प्रभाग क्रं .१४ मध्ये नाल्या तुंबल्या असून केर कचरा ठिक - ठिकाणी टाकला असल्यामुळे तो नागरिकांच्या घरामध्ये जात असल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे . रस्त्यांवर खड्डे पडले असून त्यात पाणी जमा झाल्याने विद्यार्थी, वयोवृद्धांना चालताना अडचण निर्माण झाली आहे . तसेच खांबावरील दिवे बऱ्याच दिवसांपासून बंद असल्याने चोरीच्या घटना घडण्याची दाट शक्यता आहे . आणि नळाला येणारे पाणी दुषीत असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्या स धोका निर्माण झाल्यामुळे मनपा प्रशासनानी तसेच नगरसेवकांनी यावर लवकरात लवकर उपाय योजना करण्याची मागणी फिरोज शेख जिल्हा संघटक आम आदमी पार्टी यांनी मनपाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे

### 'नीट' परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जून : राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत रविवार, २१ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील एकूण २६ उपकेंद्रांवर 'नीट युजी' परीक्षा पार पडणार आहे. ही परीक्षा पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

परीक्षेच्या दिवशी प्रश्नपत्रिकांची बेकायदेशीर छपाई किंवा इतर गैरप्रकार टाळण्याच्या उद्देशाने परीक्षा केंद्राच्या १०० किंवा आवश्यकतेनुसार २०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक परीक्षा सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदरपासून ते परीक्षा संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश या आदेशात देण्यात आले आहेत. तसेच, परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थी वगळता पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास आणि शांतता भंग होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. याव्यतिरिक्त, परीक्षा केंद्राच्या आवारात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे सोबत बाळगून प्रवेश करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

प्रतिबंधात्मक आदेश हे परीक्षेच्या कामकाजासाठी व निगराणीसाठी नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांना त्यांच्या कर्तव्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत. मात्र, ही परीक्षा अत्यंत सुरळीत आणि शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यातील इतर सर्व नागरिकांनी या प्रतिबंधात्मक आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

### लातूर जिल्ह्यात चेक बाऊन्स प्रकरणांसाठी विशेष लोक अदालत

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्दे शान्वये लातूर जिल्हा व सत्र न्यायालय तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये १८ जुलै आणि २१ नोव्हेंबर रोजी परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार दाखल असलेल्या चेक बाऊन्स (धनादेश अनादरीत) प्रकरणांसाठी विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

ज्या पक्षकारांची तसेच बँक व वित्तीय संस्थांची या कलमानुसारची प्रकरणे सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत, त्या सर्वांनी या विशेष लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.


## पाण्याचा वापर जपून करावा

## वाचनीय -- परिपूर्ण दैनिक सोलापूर तरूण भारत


# पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या जनसंवाद उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद






तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जून : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप आपल्या प्रभावी कार्यशैलीमुळेजनसामान्यात एक लोकप्रिय पोलीस अधिकारी म्हणून ओळखले जातात. सामान्य नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून असणाऱ्या अपेक्षांचा त्यांना सूक्ष्म अभ्यास आहे. त्यांच्या पुढाकाराने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या ' जनसंवाद ' उपक्रमास उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. नागरिकांच्या तक्रारी समजावून घेऊन, त्यांचा जलद निपटारा करणे व पोलीस - नागरिक यांच्यातील संवाद वाढवून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे जनतेचा पोलिसांवरील विश्र्वास दृढ करणे, या उद्देशाने पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना थेट पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर आपली व्यथा मांडण्याची संधी उपलब्ध झाली आहे. परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी, पोलीस उप महानिरीक्षक हे प्रत्येक महिन्यास जिल्हा मुख्यालयांना भेटी देत असतात. यादरम्यान, त्या त्या जिल्ह्यातील तक्रारदारांना प्रत्यक्ष भेटून, त्यांच्या तक्रारी व अडीअडचणी समजावून घेऊन, त्या तत्परतेने सोडवण्याचा पोलीस उप महानिरीक्षक यांचा प्रयत्न आहे. गत महिन्यात, लातूर, हिंगोली, परभणी व नांदेड या जिल्ह्यातील नागरिकांनी या उपक्रमाचे माध्यमातून, मोठ्या प्रमाणावर आपल्या तक्रारी पोलीस उप महानिरीक्षक यांच्यासमोर मांडल्या होत्या.

पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी, पोलीस अधीक्षक, लातूर कार्यालयात जिल्हा पोलीसांच्या कामकाजाचा मासिक आढावा घेतल्यानंतर, या वेळेत जिल्ह्यातील तक्रारदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान, एकूण (७३) तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, हरवलेले इसम, सायबर फसवणूक, दाखल गुन्ह्यांचा तपास, अवैध व्यवसाय, इत्यादी तक्रारींचा समावेश आहे.

प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना व निर्देश देण्यात आले आहेत.तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमा दरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे. याप्रसंगी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व लातूर शहरातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

## एस.टी.वाहकाची मनमानी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : लातूर - औसा प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या अमाप असून यात नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी यांचा प्रामुख्याने समादेश आहे .

सायंकाळी औशाकडे जाण्यासाठी बलसूर, सास्तूर, किनगाव - औसा ह्या बस सोडल्या तर दुसरी कुठलीच बस नाही . या गेल्या की चुकारू येणाऱ्या यवतमाळ - औसा किंवा अमरावती - औसा . याबसवर अवलंबून रहावे लागते . यानंतर ८ वाजता सुटणारी औराद या बसवर विसंबून रहावे लागत असल्यामुळे खुप वेळ वाया जात असल्यामुळे मग प्रवाशी ई - शिवाई या बसकडे वळतात . जरी प्रवाशांकडे बसचा पास असून सुद्धा जादा पैसे देऊन घर गाठण्याचा प्रयत्नात प्रवाशी असतात .

पण शनिवारी सायंकाळी७:00 वाजेच्या सुमारास प्रवाशी चक२३ -र्ी६५२९ लातूर - सोलापूर या मध्ये चढण्यासाठी बसच्या दाराजवळ गेले असता त्या बसमध्ये लेडीज वाहक अगदी चालकाजवळ उभी होती . त्यांनी प्रवाशांना विचारले कुठे जायचय ' . औसा असे प्रवाशी म्हणताच त्या लेडीज वाहकाचा पारा चढला आणि औशा चे प्रवाशी या बसमध्ये घेणार नसल्याचे सांगितल्याने प्रवाशी वाहतूक नियंत्रकाकडे जाऊन सगळी हकीकत सांगितले . त्यानीही त्या वाहकाचीच री ओढली . आणि हा वाद चालू असतानाच बस निघून गेली

या औसा प्रवाशांवर अशी सपत्न वागणूक का ? वाहक कोणाच्या जीवावर अशी मनमानी करतात ? का ई. शिवाईने औशाच्या प्रवाशांनी प्रवास करायचा नाही का? पास असून सुद्धा जास्तीचे पैसे देऊन सुद्धा प्रवास नाकारला जातो म्हणजे काय ?ही एकमेव बस नाही . जिणे औसेकरांना घेतले नाही तर लातूर . सोलापूर, औसा -सोलापूर या बसचाही समादेश आहे . याविषयी विचारले असता - ही जादा बस असल्याचे, ती विना वाहक असल्याची कारणे ऐकावी लागतात . मग प्रश्र्न पडतो की, ह्या बस औशाचा रस्ता कशाला वापरतात ? आणि त्यांच्या पाटीवरील औसा हे नाव का काढून टाकत नाहीत 'याची सखोल चौकशी होऊन वाहकावर कारवाई करावी अशी मागणी औसेकर प्रवाशांनी केली आहे

## ज्ञानाची नवी पहाट; प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशाचा संकल्प



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : शहरातील महानगरपालिका शाळा क्र. ९ आणि महानगरपालिका शाळा क्र. ११, साळे गल्ली येथे दि. १५ जून रोजी प्रवेशोत्सव-२०२६ अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशाचा यावेळी संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमास महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अभंगे, मनपा शिक्षणाधिकारी श्र्वेता नागणे हे मान्यवर प्रमुख उपस्थित होते. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व खाऊ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व गणवेशाचे वाटप करण्यात आले.

यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले. आयुक्त मानसी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, 'शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवसापासून मन लावून अभ्यास करा, चांगले संस्कार आत्मसात करा आणि भविष्यात गुणवंत नागरिक बना', असा प्रेरणादायी संदेश दिला.

यावर्षी लातूर महानगरपालिकेच्या सर्व १६ शाळांमध्ये प्रवेशोत्सव २०२६ उत्साहात साजरा करण्यात आला. महानगरपालिका शाळा आता विकासाच्या दिशेने भक्कम पाऊले टाकत असून शिक्षण क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व सुधारणा राबविण्यात येत आहेत. शैक्षणिक गुणवत्ता, आधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांमुळे पालकांचा महानगरपालिका शाळांकडे कल वाढत असून अधिकाधिक पालक आपल्या पाल्यांच्या शिक्षणासाठी मनपा शाळांना पसंती देत आहेत.

## अवैध वाहनांना आवर, महसुलात ६० लाखांची भर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : विभागीतल राष्ट्रीय परिवहन महामंडळाच्या २०० मीटर परिक्षेत्रातील अवैध प्रवासी वाहनांची तपासणी महामंडळ आणि आरटीओ कार्यालयाच्यावतीने करण्यात आली. १० दिवसांच्या या मोहिमेत लातूर विभागाच्या गतवर्षीच्या तुलनेत ६० लाख १९ हजार रुपयांची वाढ झाली आहे. उन्हाळी सुट्या संपताना राबवलेल्या या मोहिमेचा फायदा एसटी महामंडळाला झाला आहे.

५ ते १५ जूनच्या दरम्यान, लातूर विभागातील बसस्थानक परिसरातील अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर आरटीओ तसेच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष केंद्रीत केले होते. या १० दिवसांच्या कालावधीत २८५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. रा.प. महामंडळाने नेमलेल्या ३ विशेष पथकासह संबंधित आगाराच्या पथकामार्फत विभागातील सर्व बसस्थानकाच्या २०० मीटर नो पार्कीग क्षेत्रातून अवैध प्रवासी वाहतूक करण्यासाठी आलेली ४१३ वाहने प्रतिबंधित करण्यात आली आहेत. या १० दिवसांच्या कालावधीत लातूर विभागाचे गतवर्षीच्या तुलनेत उत्पन्न तर वाढलेच शिवाय प्रवाशांना अपघात विरहीत व सुरक्षित सेवा मिळाली. १५ दिवसांच्य कालावधीत परिवहन विभागाच्या अंजल पाथरे, वाहतूक पोलीस विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, विभाग नियंत्रक विलास राठोड, वाहतूक शाखेचे निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली है कारवाई झाली.

## नीट–युजी २०२६' परीक्षा तयारीचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्याकडून आढावा




तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १७ जून : येत्या २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या 'नीट-युजी २०२६' या परीक्षेच्या अनुषंगाने लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्याया बैठकीत परीक्षेच्या नियोजनबद्ध आणि पारदर्शक आयोजनासाठी संबंधित विभागांना सविस्तर सूचना देण्यात आल्या.

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा संपर्क अधिकारी डॉ. महेंद्र गायकवाड आणि महेश सूर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लातूर जिल्ह्यात एकूण २६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार आहे. यामध्ये लातूर येथील १९, अहमदपूर येथील २, उदगीर येथील २, निलंगा येथील २ आणि चाकूर तालुक्यातील चापोली येथील एका परीक्षा केंद्राचा समावेश आहे. या सर्व केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडावी आणि कोणताही गैरप्रकार होऊ नये, यावर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी 'ड्युटी मॅजिस्ट्रेट' आणि 'स्टेट ऑब्झर्वर' यांची विशेष नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

परीक्षेच्या दिवशी, म्हणजेच २१ जून २०२६ रोजी विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची तांत्रिक किंवा इतर कोणतीही अडचण आल्यास, तिचे तत्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ असा असून, विद्यार्थी व पालकांना गरजेच्या वेळी यावर संपर्क साधता येईल. तसेच परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि कोणत्याही आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीचा सामना करण्यासाठी विशेष वैद्यकीय पथके नियुक्ती करण्यात येणार आहेत.

## अभिजीत दिपके यांच्यावरील हल्ल्याचा निषेध




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १७ जून : नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ देशभर आंदोलन करणारे सामाजिक कार्यकर्ते अभिजीत दिपके यांच्यावर जयपूर येथे आंदोलनादरम्यान झालेल्या हल्ल्याचा व्हीएस पँथर्स युवा संघटनेने तीव्र निषेध केला आहे. या घटनेतील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

व्हीएस पँथर्स युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांच्या सूचनेनुसार विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या अभिजीत दिपके यांच्यावर झालेला हल्ला हा संविधानिक मूल्यांवर आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात करणारा प्रकार आहे. अशा घटनांमुळे लोकशाही व्यवस्थेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण होत असून, संबंधित हल्लेखोरांवर कठोर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी.

दोषींविरुद्ध कठोर पावले उचलली नाहीत तर संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदनावर मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे, जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे, महेश सूर्यवंशी, आदित्य माशीमोडे, स्वप्निल कटारे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आ. प्रकाश सोळंके यांचे आरोप बिनबुडाचे व तथ्यहीन; भाजप ता.अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांचा पलटवार

*माजलगांव (प्रतिनिधी):* आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी केलेले आरोप पूर्णपणे बिनबुडाचे, तथ्यहीन आणि दिशाभूल करणारे असल्याची टीका भाजपाचे माजलगाव शहर मंडळाचे तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केली आहे. प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी आमदार सोळंके यांच्या वक्तव्यांचा समाचार घेत जोरदार पलटवार केला.

रत्नपारखी म्हणाले की, जनतेसमोर खोटे आरोप करून सहानुभूती मिळविण्याचा केविलवाना प्रयत्न केला जात आहे. विकासकामां बाबत तसेच राजकीय घडामोडींविषयी करण्यात येणारी वक्तव्ये वास्तवापासून दूर असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही. आपल्या राजकीय अपयशाचे खापर इतरांवर फोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

ते पुढे म्हणाले की, माजलगांव मतदारसंघातील नागरिक सर्व परिस्थितीची जाणीव ठेवून आहेत. जनतेला दिशाभूल करून राजकीय लाभ मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. विरोधकांवर आरोप करण्याऐवजी आठवडी बाजाराचा प्रश्न , शहरातील रस्ता व माजलगाव तेलगाव रस्ता , मंजरथ रोड ते छत्रपती संभाजी महाराज चौक रस्ता राखडलेला असल्याने स्वतःच्या कार्याचा हिशोब जनतेसमोर मांडावा, असा सल्लाही त्यांनी दिला. पंकज ताई मुंडे यांनी युतीधर्म पाळा म्हणून आम्हाला आदेश दिल्यामुळे आम्ही सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केले नसता दादांचा फार मोठ्या फरकाने पराभव झाला असता ज्या भागात आमदार प्रकाश दादा सोळंके यांना कधी लीड मिळत नव्हती त्या भागात खूप मोठ्या प्रमाणात भाजपाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांमुळे लीड मिळाली आहे हे प्रकाश दादा विसरलेले दिसत आहेत.

एकंदरीत विनायक रत्नपारखी यांनी आपल्या निवेदनात, "प्रकाशदादा सोळंके यांचे आरोप बिनबुडाचे व तथ्यहीन असून त्यांचा नाकारतेपणा लपवण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत व निवडणुकीच्या निकालानंतर दादाने अनेकदा भाषणातून भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी काम केल्यामुळे माझा विजय झाला आहे असे सांगितले होते परंतु दादा हे विसरले आहेत खरंतर त्यांची साठी बुद्धी नाटी झाल्यामुळे असे तथ्यहीन आरोप करत आहेत . पहिल्यापासूनच दादा राजकीय क्षेत्रात काम करत असताना खोटं बोल पण रेटून बोल अशी अनेकदा वारंवार भूमिका बदलतात ही त्यांची जुनीच सवय व इतिहास अशी बोचरी टीकाही केली. प्रकाश सोळंके यांनी निवडून आल्यानंतर अनेकदा सत्काराच्या भाषणामध्ये पंकजा मुंडे व भाजपच्या पदाधिकारी ब कार्यकर्त्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे मी निवडून आलो आहे असे अनेकदा सांगितलेले होते परंतु ते आता हे बोललेले विसरून गेली आहेत व आता अशी चुकीची भूमिका मांडून बिंनबुडाचे तथ्यहीन आरोप करून त्यांना काय साध्य करायचे आहे.

भाजप कार्यकर्ते आणि नागरिक विकासाच्या मुद्द्यावर ठाम असून खोट्या आरोपांना बळी पडणार नसल्याचे सांगत, आगामी काळातही जनहिताच्या प्रश्नांवर भाजपची भूमिका स्पष्टपणे मांडली जाईल, असे रत्नपारखी यांनी शेवटी नमूद केले.

## नानाजी देशमुख विद्यामंदिर येथे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा विद्यारंभ

**बीड :** दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर येथे आज नवागतांचे स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ दिला. स्वावलंबन या सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता.त्यावर त्यांचे फोटो घेतले. मुलांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण करणे, त्यांना हसत खेळत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, आणि शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे हा प्रवेशोत्सव घेण्याचा मुख्य उद्देश. सकाळच्या सत्रा वेळी मा.गंगाधरजी देशमुख सर, आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मा.अर्चनाताई मोराळे उपस्थित होते. तसेच दुपारच्या सत्रात मा.अ‍ॅड.अर्चनाताई तुंगार, मा.श्रीमती. सुनंदाताई कुलकर्णी, मा.अर्चनाताई मोराळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी लाभले होते. तसेच संस्थेच्या सचिव मा.डॉ. सीमाताई जोशी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रवेशोत्सवासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## आयुष्यमान आरोग्य मंदिर सारणी (आ) येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न !!



**केज दि. १५(प्रतिनिधी) :** प्राथमिक आरोग्य केंद्र, युसूफवडगाव अंतर्गत आयुष्यमान आरोग्य मंदिर, सारणी (आ) व ग्रामपंचायत सारणी (आ) यांच्या संयुक्त विद्यमानाने NCD (असंसर्गजन्य रोग) कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या शिबिरामध्ये करण्यात आलेल्या तपासण्यमध्ये रक्तदाब, मधुमेह / रक्तातील साखर तपासणी , कर्करोग तपासणी, ईसीजी तपासणी, हिमोग्लोबीनसह सर्व आजारांची तपासणी करून औषधोपचार करण्यात आले .हे शिबीर आयोजित करण्यासाठी केज तालुका आरोग्य अधिकारी डॉ. लोमटे सर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सारूक सर, डॉ. नागरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबीर सारणी (आ) येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी आरोग्य अधिकारी डॉ कृष्णा सुर्यवंशी, आरोग्य सेवक आनंद घोडके, लॅब टेक्निशियन प्रितम बचुटे, आरोग्य सेविका रंजना दोडतले, आशाताई रोहिणी खरात, वनमाला सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## गच्चीवरुन विद्युत तारेवर पडल्याने 13 वर्षीय मुलगा गंभीर भाजला

### महावितरणवर निष्काळजीपणाचा आरोप

**अंबाजोगाई :** शहरातील माऊली नगर (पोखरी रोड) येथे घराच्या गच्चीवर साफसफाई करत असताना 13 वर्षीय मुलगा विद्युत तारेवर पडून गंभीररित्या भाजल्याची घटना घडली. उबेर बाबा पठाण (वय 13) असे जखमी मुलाचे नाव असून त्याच्यावर येथील स्वा. रा. तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, उबेर बाबा पठाण हा आपल्या नव्याने बांधलेल्या तीन मजली घराच्या गच्चीवर साफसफाईचे काम करत होता. यावेळी अचानक त्याचा तोल जाऊन तो इमारतीला अगदी जवळून गेलेल्या उच्चदाब विद्युत तारेवर कोसळला. त्यामुळे मोठा आगीचा स्फोट झाला आणि त्यात तो गंभीररित्या भाजला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्याला उपचारासाठी स्वा. रा. तीर्थ ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. संबंधित इमारतीसमोरून विद्युत तारा नेऊ नयेत, तसेच नवीन डीपी घराला खेटून उभारू नये, अशी मागणी यापूर्वीच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे करण्यात आली होती. मात्र, याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. इमारतीच्या अगदी जवळून विद्युत तारा गेल्यामुळेच हा अपघात घडल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळेच हा प्रकार घडल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## काडीवडगावच्या श्री शनी मारोती मंदिरात प्रति अमावस्या सोहळा उत्साहात



**माजलगाव, प्रतिनिधी :** शहरापासून जवळच असलेल्या काडीवडगाव 2 मंजरथ रोड माजलगाव येथील शनिदेव व मारुती मंदिरात दर महिन्याला येणाऱ्या अमावस्येनिमित्त आयोजित करण्यात येणारा धार्मिक सोहळा दि. 15 जुन २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धा व भक्तीभावाने दर्शन घेत आहेत.

यावेळी ह.भ.प. अशोक म चिगुरे कल्याण नाना शेंडगे, त्रिंबक म फपाळ, बाबासाहेब म.कर्डिले, त्रिंबक गवते, परमेश्वर पांचाळ, शिवाजी घायतीडक कोंडीराम आप्पा मुंडे पवार म,नाथा म जाधव मनोहर पांचाळ शिवाजी शेंडगे बन्शी पांचाळ रामदास कुलथे महेश बादाडे, महादेव काळे, मृदंगाचार्य विष्णू महाराज बादाडे, विठ्ठल क्षीरसागर कृष्णा जाधव व तसेच महिलाही उपस्थित मोठ्या प्रमाणत होत्या. कार्यक्रमाचे अन्नदाते अशोक महाराज हे होते तर कार्यक्रमाचे संयोजन विक्रम अच्युतराव राऊत यांनी केले होते.

# अंबाजोगाईत प्रभारी मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला घातला हार; लोकविकास महाआघाडीतर्फे तीव्र निषेध!

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई नगर परिषदेचे प्रभारी मुख्याधिकारी (CO) हे वारंवार कार्यालयात गैरहजर राहत असल्याच्या निषेधार्थ लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून अनोखे आंदोलन केले. या आंदोलनातून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी सांगितले की, मुख्याधिकाऱ्यांच्या सततच्या गैरहजेरीमुळे शहरातील विकासकामे आणि विविध प्रशासकीय प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. नागरिकांच्या समस्या आणि प्रभागातील विविध प्रश्न घेऊन नगरपालिकेत गेल्यानंतर संबंधित अधिकारी जागेवर उपलब्ध नसल्याने जनतेची कामे रखडत आहेत. अनेक फाईल्स मंजुरीअभावी प्रलंबित राहिल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याच पार्श्वभूमीवर नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात जाऊन रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध नोंदवला.

हे आंदोलन प्रशासनाच्या बेजबाबदार आणि निष्क्रिय कारभाराविरोधातील प्रतीकात्मक आंदोलन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या आणि नियमितपणे कार्यालयात उपस्थित न राहणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे शहराच्या विकासाला खीळ बसत आहे. मुख्याधिकारी नियमितपणे कार्यालयात हजर राहून नागरिकांच्या आणि शहराच्या कामांना न्याय देईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील," असा इशारा लोकविकास महाआघाडीच्या नगरसेवकांनी दिला.

यावेळी उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया,नगरसेवक तथा गटनेते सय्यद ताहेरभाई,लोकविकास महाआघाडी चे उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया, गट नेते ताहेर भाई, ऍडओकेट विकास जी काकडे (नियोजन आणि विकास समिती),पाणी पुरवठा सभापती च्या वतीने भीमसेन अप्पा लोमटे, नजीर पठाण बांधकाम सभापती स्वतः,महेशकाका लोमटे, महेशजी कदम नगरसेवक,राजपाल जावळे स्थायी समिती सदस्य, आकाश कराड नगरसेवक,रौफ भाई, अकबर भाई पठाण, सचिन विलास जाधव, शेख अश्फाक भाई हे उपस्थित होते.

## वृद्धेची ₹1 लाखांची चेन लंपास करणाऱ्यास 15 दिवसांत अटक



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहर पोलिसांची कौशल्यपूर्ण कामगिरी; सोन्याची चेन चोरीचा गुन्हा उघड,आरोपी अटक

अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने कौशल्यपूर्ण तपास, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे सोन्याची चेन चोरीचा गुन्हा अवघ्या 15 दिवसांत उघडकीस आणत आरोपीला अटक केली असून चोरीस गेलेली सुमारे ₹1 लाख किंमतीची सोन्याची चेन जप्त करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, परळी वैजनाथ येथील भीमनगर परिसरातील रहिवासी सुमनबाई मधुकर कांबळे (वय 65) यांनी दि. 1 जून 2026 रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, त्या शिवाजी चौक ते पंचायत समिती मार्गे घरी जात असताना दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना सोन्याचे बिस्कीट देण्याचे आमिष दाखवून भुरळ घातली आणि त्यांच्या गळ्यातील सुमारे ₹1 लाख किंमतीची सोन्याची चेन फसवणुकीने चोरून नेली.

या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास तांत्रिक आणि गोपनीय पद्धतीने करण्यात आला. तपासादरम्यान दि. 14 जून 2026 रोजी दिलीप विश्वनाथ स्वामी (वय 47, रा. महादेव गल्ली, चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर) यास आरोपी म्हणून निष्पन्न करून अटक करण्यात आली.

आरोपीकडून चोरीस गेलेली ₹1 लाख किंमतीची सोन्याची चेन जप्त करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक तेजस वावळे हे करीत आहेत.

सदर गुन्ह्याचा छडा लावण्यात अंबाजोगाई शहर पोलिसांना यश मिळाले असून ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे अंबाजोगाई पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या कारवाईत पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे, पोलीस नाईक तेजस वावळे, पोलीस हवालदार पांडुरंग काळे, भागवत नागरगोजे, अमोल गायकवाड तसेच पोलीस अंमलदार सुशांत गायकवाड व हनुमंत चादर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## अंबाजोगाईत पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे युद्धपातळीवर सुरू

### युवा नेते अक्षय मुंदडांनी केली प्रत्यक्ष पाहणी



**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहरात आगामी पावसाळा लक्षात घेता स्वच्छता आणि पाण्याचा निचरा सुरळीत ठेवण्यासाठी नगरपरिषदेने व्यापक स्वच्छता मोहीम हाती घेतली आहे. नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते अक्षय मुंदडा यांनी विविध भागांत सुरू असलेल्या स्वच्छता कामांची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. पावसाळ्यात निर्माण होणारी पूरसदृष्य परिस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.

शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या जयवंती नदीपात्रात वर्षभर साचलेला कचरा, प्लास्टिक, गाळ आणि इतर घाण जेसीबीच्या साहाय्याने काढण्याचे काम सध्या अत्यंत वेगाने सुरू आहे. पावसाळ्यात नदी व नाल्यांमध्ये कचरा साचल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळीत होऊन अनेक सखल भागांमध्ये पाणी तुंबण्याच्या घटना घडतात. ही संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी यंदा नगरपरिषदेने पावसाळ्यापूर्वीच विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

जयवंती नदीसह शहरातील प्रमुख नाले, पाण्याच्या वाहिन्या आणि सार्वजनिक ठिकाणांची साफसफाई करण्यात येत आहे. अक्षय मुंदडा यांनी या कामांचा आढावा घेताना कामांची गुणवत्ता आणि गती यावर विशेष भर देत संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांना वेळेत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या पाहणी दौऱ्यात नगरसेवक संजय गंभीरे, महेश आंबाड, माजी नगरसेवक संतोष शिनगारे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत धायगुडे, अमोल पवार, राम घोडके, बिभीषण भालेकर आणि स्वच्छता निरीक्षक बाळासाहेब थोरात उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचा होळ येथे महामार्गावर चक्काजाम आंदोलनांने 1 तासवाहतूक रोखली पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त



**होळ, (केज) प्रतिनिधी दि.17 जून :** क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांच्या बुलढाणा येथील बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी, संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या नेतृत्वाखाली आज दि. 17 जून रोजी सकाळी 11 वाजता बीड-अंबाजोगाई-लातूर महामार्गावर होळ येथे 1 तास चक्काजाम आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात संभाजी ब्रिगेड चे जिल्हाध्यक्ष राहूल खोडसे यांनी सहभागी होऊन पाठिंबा दिला.

सकाळी 11वाजल्यापासून शेकडो शेतकरी होळ गावाजवळील राज्य महामार्गावर एकत्र आले. महामार्गावर वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.आंदोलकांनी शेतकरी जिंकणारच", "रविकांत भाऊ तुम आगे बढो" अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. आंदोलनस्थळी पोहोचलेल्या महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या हस्ते शेतकऱ्यांच्या 10 प्रमुख मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी युसुफवडगाव पोलीस ठाण्याचे सहा.पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता.आंदोलन पूर्णपणे शांततेच्या मार्गाने पार पडले.

यावेळी जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला. ते म्हणाले, काल आम्ही केज तहसील कार्यालयासमोर टायर जाळून निषेध नोंदवला. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही, तर उद्या सरकारची खुर्ची जळायला वेळ लागणार नाही.

### विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाची गरज ओळखून आधुनिक शिक्षणाचा स्वीकार करावा – प्राचार्य यशवंत भोसले

## नालंदा फाउंडेशनतर्फे वडवणीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**वडवणी (प्रतिनिधी):** आजच्या वेगवान आणि स्पर्धेच्या युगात केवळ पारंपारिक शिक्षणावर अवलंबून राहून चालणार नाही. विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाची गरज ओळखून आधुनिक आणि रोजगाराभिमुख शिक्षणाचा स्वीकार करावा. मित्राने अ‍ॅडमिशन घेतले म्हणून मी घेतले, किंवा परिस्थिती गरिबीची आहे म्हणून मी काही करू शकत नाही, हा न्यूनगंड आता विद्यार्थ्यांनी मनातून काढून टाकला पाहिजे. 'शिकून कुठे नोकरी मिळते?' हा नकारात्मक सूर बदलण्यासाठीच प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांची नेमकी नाळ ओळखून आधुनिक 'ब्रेन ओरिएंटेड' कोर्सेस आणले आहेत. आज विद्यार्थ्यांसमोर आलेली ही संधी अत्यंत सुवर्ण असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे परखड मत डॉ. सोनाजीराव रांजवन उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंत भोसले यांनी केले.


नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. हा कार्यक्रम रविवार, दि.१४ जून रोजी वडवणी येथील हिंगलाज माता मंदिर परिसरात अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाला नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्या शोभाताई आंधळे, प्रा. ओमप्रकाश जाधव, प्रा.अर्जुन राठोड, प्राचार्य भारत मगर तसेच प्रा. विजयकुमार बोचरे, प्राचार्य संतोष मुंडे, प्रा. प्रकाश खळगे, प्रा. दत्ता नागवे, प्राचार्य विनोद लांबुड, प्राचार्य राहुल शिरसाट, प्रा.सौरभ खांडवे, प्रा. रामनाथ डोईफोडे , उपप्राचार्य अशोक मस्के आणि प्रा. विष्णू डोईफोडे आदी उपस्थित होते.

# माहिती अधिकार अधिक सुसूत्र; राज्यात नवे नियम लागू

महाराष्ट्र शासनाने माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नवीन “महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६” जाहीर केले असून हे नियम राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून लागू करण्यात आले आहेत. या नवीन नियमांमुळे माहिती मागणी, शुल्क, अपील प्रक्रिया, ऑनलाइन व्यवहार, वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि सार्वजनिक प्राधिकरणांची जबाबदारी यामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. माहिती अधिकार कायदा हा नागरिकांना शासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करणारा प्रभावी कायदा मानला जातो. गेल्या दोन दशकांत या कायद्याच्या माध्यमातून अनेक महत्त्वपूर्ण माहिती नागरिकांपर्यंत पोहोचली असून प्रशासनातील पारदर्शकता वाढण्यास मदत झाली आहे. नव्या नियमांमुळे माहिती अधिकार व्यवस्थेला अधिक स्पष्ट, सुसूत्र आणि तंत्रज्ञानाधारित स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

नवीन नियमांनुसार माहिती मिळविण्यासाठी अर्ज साध्या कागदावर संबंधित राज्य जन माहिती अधिकाऱ्याकडे सादर करावा लागणार असून अर्ज शुल्क तीस रुपये निश्चित करण्यात आले आहे. ए-४ आकाराच्या प्रत्येक पानासाठी पाच रुपये, तसेच डिजिटल किंवा स्कॅन प्रतींसाठी प्रति पृष्ठ पाच रुपये शुल्क आकारले जाणार आहे. अभिलेखांच्या तपासणीसाठी पहिला एक तास विनामूल्य राहणार असून त्यानंतर प्रत्येक तासासाठी पन्नास रुपये शुल्क आकारण्यात येईल. तसेच अर्ज एका विषयापुरताच मर्यादित ठेवण्याची अट घालण्यात आली आहे. अर्जामध्ये साधारणतः १५० शब्दांपेक्षा अधिक शब्द नसावेत आणि एका अर्जात अनेक विषयांचा समावेश असल्यास केवळ पहिल्या विषयावर विचार केला जाऊ शकतो. अर्जासोबत छायाचित्रयुक्त ओळखपत्राची स्वयं-साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक करण्यात आले असून नागरिकत्वाचा पुरावा नसल्यास अर्ज परत केला जाऊ शकतो.



डिजिटल प्रशासनाला चालना देण्यासाठी शासनाने ऑनलाइन आरटीआय प्रणाली, यूपीआय आणि इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. सार्वजनिक प्राधिकरणांवरही महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. माहिती अधिकार कायद्यानुसार स्वतःहून प्रसिद्ध करावयाची माहिती वेळेवर प्रसिद्ध न केल्यास संबंधित कार्यालय प्रमुखांवर जबाबदारी निश्चित होऊ शकते. तसेच वैयक्तिक माहितीच्या संरक्षणाबाबत नियम अधिक स्पष्ट करण्यात आले असून सार्वजनिक हिताशी संबंध नसलेल्या खाजगी माहितीच्या प्रकटनावर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. अपील प्रक्रियेसाठी प्रथम अपीलवर पन्नास रुपये तर राज्य माहिती आयोगाकडे दाखल होणाऱ्या द्वितीय अपीलसाठी शंभर रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे. यामुळे प्रक्रिया अधिक शिस्तबद्ध आणि दस्तऐवजाधारित होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

माहिती अधिकार कायदा हा लोकशाही व्यवस्थेतील नागरिक आणि प्रशासन यांच्यातील विश्वासाचा मजबूत दुवा आहे. नवीन नियमांमुळे माहिती अधिकार प्रक्रियेत सुसूत्रता, डिजिटल सुलभता आणि कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा असली तरी नागरिकांना माहिती मिळविण्याचा मूलभूत अधिकार अबाधित राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. काही तज्ज्ञांनी या नियमांचे स्वागत केले असून अर्जांचे व्यवस्थापन आणि कामकाजातील गती वाढण्याचा विश्वास व्यक्त केला आहे, तर काही सामाजिक कार्यकर्त्यांनी शुल्कवाढीबाबत चिंता व्यक्त केली आहे. तथापि, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकाभिमुख प्रशासन या मूलभूत तत्त्वांचा समतोल राखत या नियमांची प्रभावी अंमलबजावणी झाली, तर शासन आणि जनतेमधील संवाद अधिक सक्षम आणि विश्वासार्ह होण्यास निश्चितच मदत होईल.

"माहिती अधिकार नियम २०२६ मुळे माहिती मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुसूत्र, पारदर्शक आणि डिजिटल होण्यास मदत होईल. नागरिकांचा माहितीचा अधिकार अबाधित ठेवत प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्याचा हा सकारात्मक प्रयत्न आहे."

– चंद्रकांत प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विशेष सखोल पुनरिक्षणाची कामे कालमर्यादेत पूर्ण करा- गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाची सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करून हिंगोली जिल्ह्याचा राज्यातील अग्रक्रम कायम राखा- वा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाची प्रभावी आणि यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात सर्व म तदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, समाधान घुटुकडे, प्रतिक्षा भुते, उपजिल्हाधिकारी राजेश सरवदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाने, केशव गड्डापोड यांच्यासह जिल्हास्तरीय नोडल अधिकारी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले की, पूर्व विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करत हिंगोली जिल्ह्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. याच धर्तीवर सध्याच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची कामेही गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देऊन त्यांचे योग्य नियोजन करावे. यासाठी स्वतंत्र वेळापत्रक तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर यांनी विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेची माहिती देताना सांगितले की, मतदार यादीची अचूकता, सुसंगतता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करण्यासाठी मतदार केंद्रांचे मॅपिंग, ब्लर फोटो हटविणे आणि विविध तांत्रिक पडताळण्या करण्यात येणार आहेत. केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण व पूर्वतयारी, घरोघरी पडताळणी मोहीम, मसुदा मतदार यादी प्रसिद्धी, दावे व हरकती स्वीकारणे, नोटीस वाटप, दावे-हरकतींचा निपटारा आणि अंतिम मतदार यादी प्रसिद्धी अशी सहा टप्प्यांतील कामे पूर्ण करावी लागणार आहेत.

मतदार केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी प्रगणक (इन्युमरेशन) अर्जाचे शंभर टक्के वितरण करण्याची जबाबदारी पार पाडावी. हे वितरण पाच दिवसांत पूर्ण करून त्यानंतर त्याचे संकलन, नागरिकांना मार्गदर्शन आणि माहितीचे अचूक डिजिटायझेशन करून वेळेत अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच अनुपस्थित, स्थलांतरित आणि मृत मतदार तसेच अर्ज सादर न करणाऱ्या मतदारांची स्वतंत्र यादी तयार करून आवश्यक कार्यवाही करावी लागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते यांनी मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या घरोघरी पडताळणी मोहिमेची माहिती देत प्रगणक अर्ज भरण्याची प्रक्रिया आणि त्याची अंमलबजावणी याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

दरम्यान, पूर्व विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल मतदार नोंदणी अधिकारी प्रतिक्षा भुते, समाधान घुटुकडे आणि विकास माने यांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रशिक्षण कार्यक्रमात विशेष सखोल पुनरीक्षण म ोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# समन्वय समितीच्या बैठकीत विवेक गायकवाडांकडून आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

जिल्हा परिषद हिंगोली येथील सभागृहामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीची बैठक पार पडली

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी सर्व विभागांचा आढावा घेतला.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सु- धीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सा. प्र.) समृद्धी दिवाने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गडापोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) विजय बोराटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, शिक्षणाधिकारी (योजना) संदीप सोनटक्के, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) अशावरी काळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) विपुन भागवत, कृषी अधिकारी अतुल वायसे, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रियंका राजपूत, कार्यकारी अभियंता राजू नरवाडे यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

प्रामुख्याने घरकुल योजना चा आढावा घेण्यात आला राज्य पुरस्कार आवास योजना यामध्ये शबरी व रमाई योजना याचा आढावा घेण्यात आला. घरकुलाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला माझं गाव आरोग्य संपन्न गाव समिती स्थापनेचा आणि मेळावे व घेण्यात आलेले आरोग्य शिबिर यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. शाळा नुकत्याच सुरू झाल्या त्यांच्या प्रवेश उत्सव उपक्रमचा आढावा घेण्यात आला शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तक १००% वाटप करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्थानिक निधी लेखा प्रकरण व परिच्छेद यांचे काम एक महिन्यांमध्ये शंभर टक्के पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी सर्व विभाग प्रमुखांना देण्यात आले यासाठी शनिवार व रविवारी विशेष कॅम्प लावून लेखा परिच्छेद पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या विभागाकडे प्रलंबित असलेल्या अग्रिमाचा पंचायत समिती सेनगाव व पंचायत समिती औंढा यांना निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. एकल महिल सर्वेक्षणाचा आढावा घेण्यात आला पूर्ण करण्याच्य सूचना देण्यात आल्या.

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या डॉक्ट बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना यांचा आढाव घेण्यात आला त्यामध्ये सुरू असलेल्या विहिरी व सरू नसलेल्या विहिरी आणि बांधकाम पूर्ण झालेल्य विहिरी यांचा आढावा घेण्यात आला. दुहेरी लाभ दिल्या गेल्याचे आढळून आल्यास कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट निर्देश देण्यात आले

शासकीय यंत्रणेला विज बिल झिरो येण्यासाठी सव ग्रामपंचायत, अंगणवाडी शाळा, जिल्हा परिषद शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र सर्व शासकीय इमारतीवर सोलार बसविण्यासाठी सर्व विभाग प्रमुखांनी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे सीईअ विवेक गायकवाड यांनी निर्देश दिले. त्याचबरोब शेतकऱ्यांसाठी खताचा साठा सुरक्षित ठेवणे आणि बोगस बियाण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या कुठल्याह तक्रारी आल्या नाही पाहिजेत त्याचबरोबर हर घ जल योजना, न्यू स्कीम यांचा सविस्तर आढाव घेण्यात आला. बांधकाम विभागाचा आढावा घेण्यात आला. पावसाळ्याच्या पूर्वी रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्याचे निर्देश देण्यात आले. पशुसंवर्धन विभागाच्या देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेण्यात आला यात जनावरांचे लसीकरण व उपचाराचे काम वाढविण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतात, खळ्याव जाऊन जनावरांची तपासणी करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. लघु पाटबंधारे पाझ तलाव, सिंचन तलाव व नालाखोलीकरण या कामाच सखोल आढावा घेण्यात आला पावसाळ्यात काढून टाकलेला गाळ वाहून जाणार नाही याची दक्षत घेण्याच्या सूचना देण्यात आल्या तसेच बांधकाम तपासणीचे अहवाल सादर करण्याचे निर्देश यावेळ देण्यात आले.

# पीएम किसान योजनेच्या २३ व्या हप्त्याचे शनिवारी वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत एप्रिल २०२६ ते जुलै २०२६ या कालावधीसाठीचा २३ वा हप्ता शनिवार, (दि.२०) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात येणार आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने दि. २० जून हा दिवस देशभर 'पी.एम. किसान उत्सव दिवस' म्हणून साजरा करण्याचे निश्चित केले आहे.

केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित आर्थिक आधार उपलब्ध करून देण्यासाठी फ ेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना वर्षाकाठी तीन समान हप्त्यांमध्ये प्रत्येकी दोन हजार रुपये, असे एकूण सहा हजार रुपये थेट आधार-संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येतात.

राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना यापूर्वी २२ हप्त्यांद्वारे सुमारे ४१ हजार ८३ कोटी रुपयांचा लाभ वितरित करण्यात आला आहे. यंदाच्या २३ व्या हप्त्याअंतर्गत भूमी अभिलेख नोंदणी अद्ययावत करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेल्या राज्यातील सुमारे ९०.८५ लाख शेतकरी कुटुंबांना अंदाजे १,८१७ कोटी रुपयांचा लाभ थेट हस्तांतरणाद्वारे मिळणार आहे.

पी.एम. किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे फार्मर आयडी असणे आवश्यक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्रे, जिल्हा व तालुका कृषी कार्यालये, ग्रामपंचायती, कृषी उत्पन्न बाजार समित्या, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी उत्पादक संघटना तसेच प्राथमिक कृषी पतसंस्था येथे विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरी सुविधा केंद्रांवरूनही या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे.

कृषी, महसूल व वन तसेच ग्रामविकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर हा उत्सव साजरा करण्यात येणार असून, केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे.

# कळमनुरी तालुक्यातील १०९ ग्रामपंचायतीमधील ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

कळमनुरी तालुक्यातील ओबीसी समाजाच्या वतीने दिनांक १७ जून २०२६ रोजी कळम नुरी उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रतिक्षा भुते यांना निवेदन ओबीसी जनमोर्चाच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये १२ जून २०२६ रोजी कळमनुरी तालुक्यातील १०९ ग्रामपंचायती मधील प्रभागात आरक्षण सोडत राबविण्यात आली ती त्वरित रद्द करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) नुसार ओबीसींना प्रभागात २७% आरक्षण कायम करण्यात यावे. कारण प्रभाग आरक्षण सोडती मध्ये १०९ पैकी ८० ग्रामपंचायतीमध्ये ओबीसींचे राजकीय आरक्षण शून्य (झिरो) टक्के करण्यात आले आहे. यामुळे कळमनुरी तालुक्यातील ओबीसींचे ग्रामपंचायत मधील अस्तित्व पूर्णपणे संपले आहे, असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

कळमनुरी तालुक्यातील ओबीसींना मंडल आयोग आणि महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५९ च्या नियमाप्रमाणे २७% टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत कायम ठेवले नाही तर ओबीसी जनमोर्चाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष ॲड. रवि शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल गाभणे, राजेंद्र शिखरे, तुकाराम नाईक, हनुमंतराव चिलगर, शंकर मुलगीर, बालाजी काकडे, गणेश मुलगीर, प्रम ोद वडकुते, भास्कर ढाले, तुकाराम कवाने, साहेबराव मेटकर, शरद मस्के, रंगराव टेकाळे, प्रकाश गिराम, गणेश खांडेकर, अनिल मस्के, कैलास नाईक, रूखमाराव शिंदे, सुदर्शन हाके, माधवराव हाके, गजानन हराळ, सुनील मस्के, विशाल हराळ, गंगाधर कवाने, विश्वनाथ गाडेकर, शुभम सापनार, सोपान मस्के, मारोती मुटकुळे, किसन मुटकुळे आदींनी दिला आहे.

# अपर्णा गोगटेचे नेमबाजीत यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ जून**

नांदेड जिल्ह्या- तील शंकर नगर येथे एनसीसीचे शिबिर घेण्यात आले या शिबिरात सहभागी झालेल्या एनसीसी विद्यार्थिनींना रायफलिंगचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण दरम्यान अपर्णा सुधीर गोगटे या एनसीसी विद्यार्थिनींनी उत्कृष्ट रायफलिंग (नेमबाजी) केल्याने सन्मानपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. तिला एनसीसीच्या फर्स्ट अधिकारी सोनल जैस्वाल यांचे मार्गदर्शन लाभले. अपर्णा गोगटे हिने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे आई-वडील, शाळे- चे मुख्याध्यापक, प्रशिक्षक, शिक्षकांसह सर्वत्र कौतुक होत आहे.

# शहरातील धोकादायक रोहीत्र, तारा, खांब यांची दुरूस्ती करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ जून**

महावितरण कंपनीकडून वीज वितरण यंत्रणेच्या देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षेसाठी दरव- र्षी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जात असल्याचा दावा केला जातो. मात्र शहरातील अनेक भागांमध्ये धोकादायक अवस्थेतील वीज तारा, झुकलेले खांब, वारंवार नादुरुस्त होण- ारे ट्रान्सफॉर्मर आणि वाढत्या वीज अपघातांच्या धोक्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्र.१२ मधील मोंढा, पावरलूम, जनता मार्केट, सिराज कॉलनी, वडारवाडा आणि रेल्वे स्टेशन रोड परिसरातील धोकादायक वीज यंत्रणेबाबत नगरसेवक सचिन दगडू व नगरसेविका बाहेती यांनी महावितरणकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

महावितरणच्या नियमानुसार वीज तारा बदलणे, खांबांची दुरुस्ती, ट्रान्सफॉर्मरची देखभाल, झाडांच्या फांद्यांची छाटणी, तसेच वीज अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना नियमितपणे करणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी वीज यंत्रणा जीर्ण अवस्थेत दिसून येत असल्याने मेंटेनन्स कामांवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

दरवर्षी देखभालीसाठी निधी खर्च केला जात असेल तर शहरा- तील अनेक भागांमध्ये आजही धोकादायक परिस्थिती का कायम आहे? पावसाळ्याच्या तोंडावर वीज तारा आणि खांबांम ुळे अपघाताचा धोका वाढला असताना संबंधित विभागाकडू पुरेशी खबरदारी घेतली जात आहे का? याबाबतही चर्चा रंग लागली आहे.

विशेष म्हणजे, नगरसेवक सचिन दगडू व नगरसेविका बाहेती यांनी दिलेल्या निवेदनामुळे स्थानिक नागरिकांच्या भावना पुढे आल्य असून, वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी तातडीने कामे हाती घेण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, शहरातील धोकादायक वीज यंत्रणेची स्थिती पाहता महावितरणचा मेंटेनन्स निधी नेमका कुठे आणि किती खर्च होतो? हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चे च्या केंद्रस्थानी आला असून नागरिक आता प्रत्यक्ष कामांची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

# महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

येथील महाराणा प्रताप चौकात प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी आ. तान्हाजी मुटकूळे, आ. संतोष बांगर, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, राजपुत समाज जिल्हाध्यक्ष अरुणसिंह ठाकुर, सुनिलसिंह राणा, नगरसेवक गणेश बांगर पहेलवान, नाना नायक, नगरसेवक उमेश गुठ्ठे, राजपुत समाज प्रमुख माजी नगरसेवक शंभुसिंह गहिलोत, बालाजीसिंह चौहान, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष मिलिंद उबाळे, डॉ.सत्यनारायण तापडीया, शिवानंद होकर्णे, राजु यादव, दिपक सेठी, रणधीरसिंह ठाकुर, विश्वजीत गहिलोत, करणसिंह ठाकुर, गजाननसिंह ठाकुर, संतोषसिंह ठाकुर, रमेश सेठ मेहता, बजरंग दलाचे राजेंद्रभैय्या हलवाई, मयुर कयाल, अजयसिंह चौहान, दिगांबर टाक, रज्जु भैया, संतोष डहाळे, जुबेर मामु, अमोल जमदाडे, पिंटु टाले, बबलु मंगरुळकर, टिंकु बगडीया आदींची उपस्थिती होती.

# जवाहर रोडवर अस्ताव्यस्त वाहने उभी केल्यामुळे नेहमीच वाहतुकीची कोंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

शहरातील मुख्य बाज- ारपेठ आणि वर्दळीचा भाग असलेल्या जवाहर रोडवरील वाहतुकीची कोंडी आता वाहनचालक आणि नागरिकांसाठी कायमची डोकेदुखी ठरत आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूंना अस्ताव्यस्तपणे उभी केली जाणारी वाहने आणि त्यातच होणारी अतिक्रमणे यामुळे रस्त्याला जणू काही पार्किंगचे स्वरूप आले आहे. परिणामी, दररोज या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून, पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे.

जवाहर रोड हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापारीदृष्ट्या गजबजलेला रस्ता आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून वाहने पार्क करण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. मनमानी पद्धतीने लावण्यात येणाऱ्या या वाहनांमुळे रस्त्याची रुंदी कमालीची कमी हो- ते आणि तासनतास वाहनांच्या रांगा लागतात. या कोंडीमुळे व्यापारी, ग्राहक आणि स्थानिक नागरिक पुरते हैराण झाले असून, याचा थेट फटका बाजारपेठेतील व्यवसायालाही बसत आहे.

या गंभीर समस्येकडे स्थानिक प्रशासन आणि वाह- तूक शाखा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांमधून केला जात आहे. वाहतूक पोलिसांनी या मार्गावरील अनधिकृत पार्किंग आणि अस्ताव्यस्त वाहने लावणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, तसेच जवाहर रोडवरील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे.

# शाळा सुरू होताच शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ जून**

नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होऊन अवघे दोन दिवस झाले असून, बाजारपेठेत आता शालेय साहित्य खरेदीची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. आपल्या पाल्यांना लागणारे पुस्तक, वह्या, पेन आणि दप्तर यांसारख्या विविध शैक्षणिक साहित्यांची खरेदी करण्यासाठी पालकांनी दुकानांवर एकच गर्दी केली आहे.

शाळांची घंटा वाजल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्स- ाह दिसून येत आहे. पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे विविध रंगीबेरंगी दप्तरे, कंपास बॉक्स, वेगवेगळ्या कंपन्यांच्या वह्या आणि पाठ्यपुस्तकांनी बाजारपेठेतील दुकाने ओसंडून वाहत आ- हेत. यंदा कार्टून कॅरेक्टर आणि आकर्षक डिझाईन्स असलेल्या वॉटर बॅग्स आणि दप्तरांना चिमुकल्यांकडून मोठी मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. दोन दिवसांपासून शाळा प्रत्यक्ष सुरू झाल्याने पालकांनीही कोणतीही दिरंगाई न करता खरेदीसाठी बाजारात धाव घेतली आहे.

यंदा कागदाच्या वाढलेल्या किम तींमुळे वह्या आणि पुस्तकांच्या दरात काही प्रमाणात वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यातच स्कूल बॅग्स आणि इतर साहित्यांचे भावही वाढले आहेत. वाढत्य महागाईमुळे पालकांचे आर्थिक बजेट थोडे कोलमडले असले तरी मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये आणि त्यांचा उत्साह टिकून राहावा यासाठी पालक वर्ग आर्थिक जुळवाजुळव करून शैक्षणिक साहित्य खरेदी करतान दिसत आहे. यामुळे शहरातील स्टेशनरी आणि कटलरी दुकानांम ध्ये सकाळपासूनच मोठी आर्थिक उलाढाल सुरू आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तख्त सचखंड श्री हजूर साहिब , हॉलिसिटीसह गोदावरी जागतिक वारसा यादीत समावेश करण्याच्या प्रक्रियेला गती

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुन -**

राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी तख्त सचखंड श्री हजूर साहिब आणि पवित्र गोदावरी नदी काठावरील सांस्कृतिक परिदृश्याचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश व्हावा , नांदेडला पवित्र शहर हॉलिसिटी करावी यासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांना महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. भारत सरकारच्या भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने (SI) खा. डॉ. गोपछडे यांच्या पत्राची सकारात्मक दखल घेत या प्रस्तावास पुढे नेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे महासंचालक यदुबीर सिंह रावत यांनी खासदार डॉ. गोपछडे यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे की, तख्त सचखंड श्री हजूर साहिब आणि पवित्र गोदावरी नदीकाठावरील सांस्कृतिक परिदृश्य सध्या युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट नसले तरी त्याचे ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन हा विषय आवश्यक कार्यवाहीसाठी महाराष्ट्र राज्याच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाकडे पाठविण्यात आला आहे.

पत्रात पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की, कोणत्याही स्थळाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होण्यासाठी त्या स्थळाने उत्कृष्ट वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value), प्रामाणिकता (uthenticit) आणि अखंडता (Integrit) यांसह युनेस्कोने निश्चित केलेले निकष पूर्ण करणे आवश्यक असते. तसेच नामांकन प्रक्रियेपूर्वी प्रस्तावित स्थळाचे प्राथमिक मूल्यमापन (Preliminary ssessment) करणे आणि त्याचा तात्पुरत्या यादीत (Tentative List) समावेश करणे ही देखील अनिवार्य प्रक्रिया आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने आपल्या पत्रात खासदार डॉ. गोपछडे यांना आश्वस्त केले आहे की, महाराष्ट्र शासनामार्फत आवश्यक कागदपत्रे आणि सर्व निकषांची पूर्तता करून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर युनेस्को नामांकन प्रक्रियेस पुढे नेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

उल्लेखनीय आहे की, खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान कार्यालय तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालयांकडे हा विषय प्राधान्याने मांडला होता. त्यांचे मत आहे की, तख्त सचखंड श्री हजूर साहिब, जे शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक अत्यंत पवित्र तख्त आहे, तसेच गोदावरी नदीशी निगडित संपूर्ण सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही केवळ महाराष्ट्राची नव्हे तर संपूर्ण भारताची अमूल्य सांस्कृतिक धरोहर आहे. या स्थळाचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्यास जागतिक स्तरावर त्याची ओळख, प्रतिष्ठा आणि धार्मिक-सांस्कृतिक पर्यटनाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होईल.

यावेळी खा. डॉ. गोपछडे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र शासनाने यापूर्वी महाराष्ट्रातील बारा ऐतिहासिक गडकिल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळवून देण्यासाठी सर्वंकष नियोजन, तांत्रिक दस्तऐवजीकरण आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याचप्रमाणे तख्त सचखंड श्री हजूर साहिब गोदावरी सांस्कृतिक परिदृश्याच्या प्रस्तावासाठी आवश्यक सर्व निकषांची पूर्तता करून महाराष्ट्र शासन हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाच्या जतनासाठी सातत्याने कार्यरत असून, महाराष्ट्र शासनाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर हा विषय युनेस्कोसमोर प्रभावीपणे आणि रीतसर मांडण्यासाठी आवश्यक ती भूमिका बजावेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.


खा. डॉ. गोपछडे म्हणाले की, तख्त सचखंड श्री हजूर साहिबगोदावरी सांस्कृतिक परिदृश्याला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळवून देणे हे केवळ एका व्यक्तीचे किंवा संस्थेचे कार्य नसून केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, शीख समाजासह सर्वधर्मीय समाज, वारसा तज्ज्ञ, इतिहास संशोधक आणि स्थानिक समाज यांच्या संयुक्त प्रयत्नांतून साकार होणारे राष्ट्रीय महत्त्वाचे अभियान आहे. सर्व संबंधित घटकांनी समन्वयाने कार्य केल्यास नांदेडच्या या अद्वितीय आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला जागतिक स्तरावर योग्य स्थान प्राप्त होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाकडून प्राप्त झालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला नवी गती मिळाली असून, नांदेडच्या या जागतिक महत्त्वाच्या वारशाला भविष्यात युनेस्को जागतिक वारसा स्थळाचा मान मिळण्याच्या आशा अधिक बळकट झाल्या आहेत. हा उपक्रम केवळ नांदेड आणि महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या जतन, संवर्धन आणि जागतिक प्रतिष्ठावृद्धीसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरणार असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# नंदिग्राम एक्सप्रेसच्या डब्बा कपातीविरोधात केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ जुन -**

नंदिग्रामएक्सप्रेस(११००१/११००२) या महत्त्वपूर्ण रेल्वेगाडीतील डब्बा संरचनेत करण्यात आलेल्या बदलामुळे निर्माण झालेल्या प्रवासी समस्यांची दखल घेत किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून गाडीतील डब्ब्यांची संख्या वाढविण्याची आणि पूर्वीप्रमाणे स्लीपर श्रेणीतील डब्बे उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली आहे. हे निवेदन दिनांक १६ जून २०२६ रोजी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे सादर करण्यात आले.



निवेदनात आमदार केराम यांनी नमूद केले आहे की, नंदिग्राम एक्सप्रेस ही केवळ एक रेल्वेगाडी नसून मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा या तीन महत्त्वाच्या प्रदेशांना जोडणारी जीवनवाहिनी आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, भोकर, हिमायतनगर, किनवट, आदिलाबाद, चंद्रपूर आणि बल्लारशाह यांसारख्या शहरांसह अनेक आदिवासी, ग्रामीण आणि दुर्गम भागातील लाखो नागरिक या गाडीवर अवलंबून आहेत. शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, व्यवसाय, धार्मिक पर्यटन तसेच सामाजिक कारणांसाठी या मार्गावरील नागरिक मोठ्या प्रमाणावर नंदिग्राम एक्सप्रेसचा वापर करतात. विशेषतः किनवट, माहूर, हिमायतनगर, आदिलाबाद आणि नांदेड परिसरातील विद्यार्थ्यांसाठी, रुग्णांसाठी आणि रोजगाराच्या निमित्ताने मुंबईकडे जाणाऱ्या नागरिकांसाठी ही गाडी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. नंदिग्राम एक्सप्रेसमध्ये वर्षभर मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. उन्हाळी सुट्ट्या, दिवाळी, गणेशोत्सव, विवाह हंगाम आणि इतर सण-उत्सवांच्या काळात तर या गाडीच्या आरक्षणासाठी दीर्घ प्रतीक्षा यादी लागते. अनेक वेळा स्लीपर व वातानुकूलित दोन्ही श्रेणींमध्ये शेकडो प्रवासी प्रतीक्षा यादीवर राहतात. अशा परिस्थितीत रेल्वे प्रशासनाने डक्ह डब्ब्यांची सुविधा देताना गाडीतील एकूण डब्ब्यांची संख्या कमी केल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. रेल्वे प्रशासनाने नव्या संरचनेनुसार नंदिग्राम एक्सप्रेसमधील एकूण डब्ब्यांची संख्या १८ वरून १६ केली असून सर्वसामान्य प्रवाशांचा मुख्य आधार असलेल्या नॉन एसी स्लीपर डब्ब्यांची संख्या ८ वरून ५ करण्यात आली आहे. आमदार केराम यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, डक्ह डब्बे अधिक सुरक्षित आणि आधुनिक असल्यामुळे त्यांचे स्वागत आहे; मात्र आधुनिकीकरणाच्या नावाखाली प्रवासी क्षमता कमी करणे योग्य ठरणार नाही. देशातील अनेक महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्या आज २० ते २२ किंवा त्यापेक्षा अधिक डब्ब्यांसह धावत असताना वर्षभर प्रचंड गर्दी असलेल्या नंदिग्राम एक्सप्रेसमध्ये डब्बे कमी करणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक मोठ्या प्रमाणात स्लीपर वर्गातून प्रवास करतात. त्यामुळे स्लीपर डब्ब्यांची कपात झाल्यास सर्वसामान्य प्रवाशांवर त्याचा विपरीत परिणाम होणार असल्याची बाब त्यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. आमदार केराम यांनी नंदिग्राम एक्सप्रेसची डब्बा संरचना तातडीने पुनर्स्थापित करून प्रवाशांच्या वाढत्या गरजेनुसार वाढीव डब्बे जोडण्याची मागणी केली आहे. त्यांनी गाडीमध्ये एक प्रथम श्रेणी वातानुकूलित डब्बा, दोन एसी टू-टियर डब्बे, तीन एसी थ्री-टियर डब्बे, पाच एसी इकॉनॉमी श्रेणीचे डब्बे आणि आठ नॉन एसी स्लीपर डब्बे उपलब्ध करून देण्याची सूचना केली आहे. तसेच आवश्यकतेनुसार सामान्य व गार्ड-लगेज डब्ब्यांची संख्या वाढवून गाडीची एकूण क्षमता वाढविण्याची मागणीही त्यांनी केली आहे. नंदिग्राम एक्सप्रेस ही मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा या विस्तीर्ण प्रदेशातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेली सेवा असल्याने रेल्वे प्रशासनाने प्रवासी हिताला प्राधान्य देऊन या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आमदार भीमराव केराम यांनी केलेल्या या पाठपुराव्यामुळे या मार्गावरील प्रवाशांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून रेल्वे मंत्रालय याबाबत काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नारायण संगेवार पुरस्काराने सन्मानित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ जुन -**

प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील हदगांव तालुक्यातील सरपंच नारायण लक्ष्मण संगेवार यांना सोयाबीन लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाधन योद्धा पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला.

हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो. असे मत पुरस्कार विजेते नारायण लक्ष्मण संगेवार यांनी कार्यक्रमात बोलताना मांडले.

# आईच्या कष्टांचे चीज; आदिनाथ डोंगरेचे एमएच-सीईटीमध्ये घवघवीत यश

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ जुन -**

तालुक्यातील बेल्लोरी धानोरा येथील विद्यार्थी आदिनाथ श्रीधर डोंगरे याने एमएच-सीईटी (अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा) मध्ये ९९.०१ पर्सेंटाईल गुण प्राप्त करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेल्या या यशामुळे परिसरातून त्याचे कौतुक होत आहे.

आदिनाथ हा ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थी असून त्याने इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतचे संपूर्ण शिक्षण स्थानिक स्तरावर पूर्ण केले. विशेष म्हणजे, कोणत्याही प्रकारचे कोचिंग क्लास किंवा खासगी शिकवणी न लावता केवळ जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर त्याने हे यश मिळवले आहे. आदिनाथ इयत्ता दहावीत असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यामुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले. घरातील आर्थिक परिस्थिती नाजूक असून शेती हेच कुटुंबाचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत आईने घेतलेल्या अथक परिश्रमांचे चीज आदिनाथने आपल्या यशातून केले आहे. त्याच्या या यशामागे आईची मेहनत, त्याग आणि प्रेरणा महत्त्वाची ठरल्याचे बोलले जात आहे. भविष्यात राज्यातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन सक्षम अभियंता बनण्याचे आदिनाथचे स्वप्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्याचे हे यश प्रेरणादायी ठरत असून सर्व सुविधा उपलब्ध असूनही अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्याच्याकडून प्रेरणा घेण्याची गरज असल्याची भावना व्यक्त होत आहे.



आदिनाथ डोंगरे यांच्या या यशाबद्दल आमदार भीमराव केराम, भाजप नेते सुधाकर भोयर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड, ज्येष्ठ नेते सोपानराव केंद्रे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पुरसिंग राठोड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे, विश्व हिंदू परिषदेचे अनिरुद्ध केंद्रे, शिवसेना तालुका प्रमुख बालाजी मुरकुटे पाटील, माजी उपसभापती श्रीराम कांदे, प्रा. विभीषण पाळवदे, प्रा. गोवर्धन लांब, ड. रमण जायभाये, आत्माराम मुंडे पाटील, मुक्तीराम घुगे, युवा नेते ज्ञानेश्वर दहिफळे, संचालक संजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे श्यामसुंदर केंद्रे, रामदास फड, विवेक केंद्रे, विनायक मुसळे, समीर जायभाये, योगेश जायभाये यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. आदिनाथच्या या यशामुळे बेल्लोरी धानोरा परिसरासह संपूर्ण किनवट तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मॉरिशसमधील गझल मुशायरा व कविसंमेलनाच्या अध्यक्षपदी बापू दासरी

**नांदेड** -मॉरिशस येथे पार पडणाऱ्या सातव्या अक्षर विश्व मराठी साहित्य संमेलनात होणाऱ्या गझल मुशायरा व कवी संमेलनाच्या अध्यक्ष स्थानी नांदेडचे कवी बापू दासरी यांची निवड करण्यात आली आहे, असे आयोजकांनी नुकतेच जाहीर केले आहे. गेल्या ४० वर्षापासून मराठी गझल चळवळीत बापू दासरी यांचे सक्रीय योगदान असून, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील अनेक काव्यमैफिली शासकीय कार्यक्रम व गझल मुशायऱ्यांचे बहारदार सूत्रसंचालन करण्याचा लौकिक बापू दासरी यांच्या नावावर आहे. तसेच गेल्या अकरा वर्षापासून नांदेड येथे पार पडणाऱ्या दिवाळी पहाट कार्यक्रमाच्या यशस्वीतेत त्यांचा वाटा असून ते दिवाळी पहाटच्या समितीचे अध्यक्ष आहेत. बापू दासरी यांनी लिहिलेल्या लावणीला आनंद शिंदे यांनी संगीत दिले असून सुरेखा पुणेकरांनी खास शैलीत साखरपुड्याची लावणी गायली म्हणून रसिकांनी त्याचे स्वागत केले आहे. नुकतेच डिसेंबरमध्ये पार पडलेल्या हेमलकसा येथील पहिल्या मराठी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद दासरींनी भूषविले असून, त्या संमेलनात डॉ. प्रकाश आमटे यांना जीवनगौरव पुरस्कार बापूदासरींच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता हे विशेष! राजपत्रित अधिकारी पदावर काम करून देखील कविता गझल साहित्य यामुळे बापू दासरी यांना सिद्ध हस्तलेखक म्हणून संबोधल्या जाते. दोन राज्यस्तरीय काव्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक त्यांच्या नावावर आहेत. मागच्या निवडणुकीमध्ये मतदार जागृती अभियानात दासरींनी लिहिलेले मतदानाचे गाणे राज्यभरामध्ये शासकीय स्तरावर गौरविल्या गेले. राजहंस प्रकाशनाने नुकताच बापू दासरींचा मातृ सुक्त हा काव्यसंग्रह प्रकाशित केला असून, साहित्य भारती या विख्यात साहित्यिक चळवळीचे ते जिल्हाध्यक्ष आहेत. कलांगण प्रतिष्ठान, ललित कला प्रतिष्ठान या सांस्कृतिक संस्थांचे दासरी हे पदाधिकारी असून, दिव्यांग कल्याण आणि जेष्ठ नागरिकांचे कल्याणाच्या चळवळीत देखील ते सक्रिय आहेत. जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे सुद्धा ते सदस्य आहेत. अनेक नवीन गझलकरांना गझल कार्यशाळेत मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या निवडीमुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## नीट (युजी) परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड** -NEET-UG-२०२६ फेर प्रवेश परीक्षा रविवार २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध ४२ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या केंद्रापासून ५०० मिटरच्या परिसरात २१ जून रोजी सकाळी ८ ते सायं ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी याबाबतचा आदेश १७ जून २०२६ रोजी निर्गमीत केला आहे. या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील ५०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स,एस.टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि

# सिंधी गावच्या पाणीटंचाईवर कवळे गुरुजींचा दिलासादायक निर्णय; स्वखर्चातून १० लाखांची विहीर उभारणार

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १७ जुन -**

समाजकारण आणि जनसेवा ही केवळ भाषणांपुरती मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले सिंधी गावचे भूमिपुत्र उदोजक मारोतराव कवळे गुरुजी यांनी गावकऱ्यांच्या पाणीप्रश्नावर मोठा निर्णय घेत स्वखर्चातून तब्बल १० लाख रुपये खर्च करून विहीर उभारण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे संपूर्ण गावात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

सिंधी गावात गेल्या काही वर्षांपासून पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर स्वरूप धारण करत होती. विशेषतः उन्हाळ्याच्या



दिवसांत माता-भगिनींना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत असे अनेकदा पाण्याअभावी दैनंदिन जीवन विस्कळीत होत असल्याचे चित्र गावात पाहायला मिळते होते या परिस्थितीची जाणीव ठेवून कवळे गुरुजी यांनी गावातील नागरिकांच्या समस्या जवळून जाणून घेतल्या आणि त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा निर्धार केला.

गावातील विविध मान्यवर, ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत गावाच्या पाणीप्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी गावातील महिलांना आणि सर्वसामान्य नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणी ऐकून मारोतराव कवळे गुरुजी भावूक झाले. आपल्या गावातील बांधवांची होत असलेली हालअपेष्टा पाहवत नसल्याने त्यांनी कोणतीही शासकीय मदत अथवा निधीची वाट न पाहता स्वतःच्या खर्चातून १० लाख रुपयांची विहीर बांधून देण्याचा निर्णय जाहीर केला.

या बैठकीस समिती अध्यक्ष नारायण पाटील कवळे, उपाध्यक्ष दादाराव पाटील पुयड, सदस्य लिंग्राम पाटील कवळे, मारोतराव विठ्ठलराव कवळे, गोविंद मारोतराव पुयड, मधुकर हणमंतराव कवळे यांच्यासह गावातील सर्व कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कवळे गुरुजी यांच्या या निर्णयामुळे गावकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. सिंधी गावाच्या इतिहासात पाणीटंचाईच्या प्रश्नावर घेतलेला हा निर्णय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून भविष्यात अनेक कुटुंबांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे. जनतेच्या अडचणी ओळखून त्यावर तत्काळ कृती करणारे नेतृत्वच खऱ्या अर्थाने लोकनेते ठरते, याची प्रचिती कवळे गुरुजी यांच्या या लोकहितकारी निर्णयातून पुन्हा एकदा जनतेला पाहवयास मिळाले आहे.

# पाऊस लांबल्याने शेतकरी चिंतेत

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १७ जुन -**

तालूक्यातील शेतकरी शेतीची सर्व कामे उरकून घेत पेरणीसाठी सज्ज झाला असून पावसाअभावी पेरण्या खोळंबल्याने शेतकरी चिंतेत असल्याचे दिसत आहे.

खरीपाच्या पेरणीसाठी लागणारी सर्व बि-बियाणे व खते खरेदी करण्यासाठी शेतकरी कृषि दूकानावर गर्दी करीत आहेत उसनवारी करुन महागा मोलाचं बि-बियाणे व खते खरेदी करण्यात आली मात्र पाऊस लांबल्याने पेरणी थांबली मृगनक्षत्र कोरडे जात असल्याने शेतकरी चिंता व्यक्त करीत आहेत.मागील वर्षी झालेल्या कर्जाची परतफेड करण्याच्या विवंचनेत असलेला शेतकरी राजा पाऊस पडावा म्हणून आकाशाकडे चातकाप्रमाणे वाट पहात आहे.जून महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही शेतकरी हवालदिल झाला कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी शेतामध्ये दिवस रात्र काबाडकष्ट करुन कधी अतिवृष्टिमूळे शेतीचे होणाऱ्या नूकसानीला सामोरे जावे लागते तर कधी अस्मानी संकटाला तोंड द्यावे लागते शासनाच्या विविध योजना कागदावर असतात प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना काही मिळत नाही दिवस रात्र शेतामध्ये कष्ट करुन मिळालेल्या उत्पन्नातून मूला मूलींचे शिक्षण व त्यांचे आरोग्याकडे लक्ष देत संसाराचा गाडा चालवावा लागतो जून महिना संपत आला तरीही पावसाचे आगमन झाले नाही योग्यवेळी पेरणी झाली तरच समाधानकारक उत्पन्न मिळते अवेळी पाऊस झाल्याने उत्पन्नात घट होते.भोकर तालूक्यात बहूतांश कोरडवाहू क्षेत्र आहे कष्टाने पिकवलेल्या मालाला बाजारात हमी भाव मिळत नाही हे विदारक चित्र आहे.

# शेतकरी हितासाठी आ.अंतापूरकरांची धडपड फळाला, प्रलंबित पिकविम्याचे प्रश्न मार्गी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १७ जुन -**

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील हजारो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली असून अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या पिकविमा रकमेचे वितरण अखेर सुरू झाले आहे. देगलूर, खानापूर, मरखेल, बिलोली आणि कुंडलवाडी महसूल मंडळांतील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये पिकविमा रक्कम जमा होण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रश्नावर सातत्याने पाठपुरावा करत आ. जितेश अंतापूरकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रलंबित पिकविमा प्रकरण तातडीने मार्गी लावण्याची मागणी केली होती. शेतकऱ्यांच्या अडचणी शासनदरबारी प्रभावीपणे मांडत त्यांनी संबंधित यंत्रणेशी सातत्याने संपर्क ठेवला. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याचे दिसून येत आहे.



खरीप हंगामाच्या तोंडावर बियाणे, खते, कीटकनाशके आणि इतर शेतीविषयक खर्चासाठी आर्थिक तरतूद करणे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत असते. अशा परिस्थितीत पिकविमा रक्कम वेळेवर मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार असून आगामी हंगामाच्या तयारीला गती मिळणार आहे.

मतदारसंघातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी पिकविमा वितरण प्रक्रिया सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या मते, दीर्घकाळ प्रलंबित असलेला प्रश्न सोडविण्यासाठी झालेल्या प्रभावी पाठपुराव्यामुळे त्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरम्यान, देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या खात्यात प्रलंबित पिकविमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाल्यानंतर आ. जितेश अंतापूरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे आभार व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या हिताच्या या महत्त्वपूर्ण प्रश्नाला सकारात्मक प्रतिसाद देत निधी वितरणाची प्रक्रिया गतीने मार्गी लावल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे विशेष आभार मानले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ आश्वासनांपुरते न थांबता त्यांचे प्रश्न शासनस्तरावर प्रभावीपणे मांडून न्याय मिळवून देण्याची भूमिका आ. जितेश अंतापूरकर यांनी कायम ठेवली आहे. पिकविमा प्रकरणात मिळालेले हे यश शेतकरी हितासाठी त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे आणखी एक उदाहरण मानले जात आहे.

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पिकविमा निधी वितरणाला सुरुवात झाल्याने देगलूर-बिलोली मतदारसंघातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून ग्रामीण भागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन मानले आभार**

देगलूर-बिलोली मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या खात्यात प्रलंबित पिकविमा रक्कम जमा होण्यास सुरुवात झाल्यानंतर आ. जितेश अंतापूरकर यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत शेतकरी हिताच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. केवळ मागणी करून थांबण्याऐवजी प्रश्न मार्गी लागल्यानंतर शासनाच्या सकारात्मक भूमिकेची दखल घेत आभार व्यक्त करण्याची त्यांची भूमिका विशेष ठरली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मानवत-मानोली रस्त्यावर अज्ञात मानवी सांगाडा आढळला

#### फॉरेन्सिक तपासणीत जखमांच्या खुणा नाहीत; पोलिसांकडून ओळख पटविण्याचे आवाहन

**मानवत,/प्रतिनिधी :** मानवत ते मानोली रस्त्यावरील एका शेताच्या बांधावर अज्ञात व्यक्तीचा मानवी सांगाडा आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना रविवारी (दि. ७) सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सोमवारी अतिरिक्त पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. यानंतर त्यांनी रुग्णालयात जाऊन तपासाचा आढावा घेतला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आढळून आलेल्या सांगाड्याचे विच्छेदन व फॉरेन्सिक परीक्षण करण्यात आले आहे. प्राथमिक फॉरेन्सिक अहवालानुसार मृत व्यक्तीच्या कवटीवर किंवा इतर हाडांवर कोणत्याही प्रकारच्या जखमा, मारहाण अथवा हिंसाचाराच्या खुणा आढळून आलेल्या नाहीत. त्यामुळे मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून सर्व शक्यतांचा तपास सुरू आहे. आढळून आलेल्या सांगाड्याच्या अंगावर पांढऱ्या रंगाचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची हाफ पॅन्ट असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या वर्णनाशी जुळणारी कोणतीही व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती असल्यास किंवा या प्रकरणासंदर्भात कोणतीही माहिती असल्यास नागरिकांनी तात्काळ मानवत पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी पोलीस निरीक्षक दर्शन शिंदे यांनी केले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देवकते करीत असून अज्ञात व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी विविध स्तरांवर तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### परभणी जिल्हा केमिस्ट अॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशनवर केमिस्ट एकता पॅनलचे वर्चस्व : १५ पैकी १३ जागांवर दणदणीत विजय; संजय मंत्री अध्यक्षपदी विजयी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सन २०२६ ते २०२९ या कालावधीसाठी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदाचे उमेदवार संजय मंत्री यांच्या नेतृत्वाखालील केमिस्ट एकता पॅनलने १५ पैकी १३ जागांवर विजय मिळवत संघटनेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. प्रतिस्पर्धी परिवर्तन पॅनलला केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले.

परभणी येथील औषधी भवनमध्ये रविवारी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. त्यानंतर दुपारी ३ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. मतमोजणीअंती केमिस्ट एकता पॅनलने बहुसंख्य जागांवर विजय मिळवत संघटनेची सत्ता कायम राखली. निवडणुकीपूर्वीच केमिस्ट एकता पॅनलचे बा. सु. टेंगसे (जिल्हा प्रतिनिधी) आणि गणेश दरगड (कोषाध्यक्ष) हे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. मतदानातून झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी संजय मंत्री, सचिवपदी दत्ताराव उर्फ मुन्ना गाडगे आणि सहसचिवपदी संजय (राणा) मारोतराव नाईक यांनी विजय मिळवला. कार्यकारिणी सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत पवन झांजरी, अनिल हराळ, पुरुषोत्तम (सुनील) जोशी, चेतनकुमार (नारायण) मुंदडा, संदीप कोटलवार, संदीप टाक, नंदकुमार (नंदू) भरड आणि डॉ. अजयसिंग ठाकूर हे उमेदवार विजयी झाले. परिवर्तन पॅनलकडून उपाध्यक्षपदी नितीन चिद्रवार तसेच कार्यकारिणी सदस्यपदी शशिकांत नाकाडे यांनी विजय मिळवत पॅनलचे खाते उघडले.

### वीज समस्येवरून आडगाव महावितरण कार्यालयासमोर आंदोलन; आत्मदहनाचा प्रयत्न पोलिसांनी हाणून पाडला : लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील आडगाव बाजार मंडळातील गावांमध्ये वारंवार वीज खंडित होणे आणि लोडशेडिंगच्या समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी सोमवारी (दि. ८ जून) आडगाव महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडले. यावेळी आंदोलक प्रल्हाद दाभाडे यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. महावितरण अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले.

आडगाव बाजारसह मंडळातील विविध गावांमध्ये कडक उन्हाळ्यातही वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या समस्येबाबत ग्रामस्थांनी काही दिवसांपूर्वी महावितरण विभागाकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र परिस्थितीत कोणतीही सुधारणा न झाल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

### मिरखेल व उमराम येथे दोन नवीन 'हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर' कार्यान्वित;

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने रेल्वे सुरक्षिततेच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मिरखेल आणि उमराम येथे दोन नवीन हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर कार्यान्वित केले आहेत. हे दोन्ही डिटेक्टर २७ मे २०२६ पासून कार्यरत झाले असून त्यामुळे नांदेड विभागातील 'हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर' केंद्रांची संख्या तीनवरून पाच झाली आहे.

यापूर्वी नांदेड विभागात मुगट, बसमत आणि दौलताबाद येथे हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर कार्यरत होते. नव्या केंद्रांच्या समावेशामुळे रेल्वे मार्गावरील सुरक्षितता व्यवस्थेला अधिक बळकटी मिळाली आहे. हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने धावत्या गाड्यांमधील कार्ट्रिज टेपर रोलर बेअरिंग आणि ॲक्सल बॉक्सच्या स्थितीवर रिअल-टाइममध्ये प्रभावीपणे लक्ष ठेवणे शक्य होते. गाडी नियमित वेगाने धावत असताना ही प्रणाली ॲक्सल बेअरिंगचे तापमान स्वयंचलितपणे मोजते. तापमानात असामान्य वाढ आढळल्यास संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना दिली जाते. यामुळे किरकोळ दोष मोठ्या बिघाडात रूपांतरित होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतात. परिणामी अपघातांचा धोका कमी होऊन रेल्वे वाहतुकीची सुरक्षितता अधिक मजबूत होते. या तंत्रज्ञानामुळे रोलिंग स्टॉक तसेच रेल्वे पायाभूत सुविधांचे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होते. याशिवाय रेल्वे वाहतुकीतील अडथळे कमी होऊन प्रवासी आणि मालवाहतूक गाड्यांची विश्वासार्हता वाढते. दोषांचे वेळेवर निदान झाल्याने देखभाल व दुरुस्तीचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते आणि सेवा खंडित होण्याचे प्रमाणही कमी होते. हॉट ॲक्सल बॉक्स डिटेक्टर नेटवर्कचा हा विस्तार भारतीय रेल्वेच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षित, स्मार्ट आणि कार्यक्षम रेल्वे संचालनाच्या बांधिलकीचे प्रतीक मानला जात आहे. रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या १९ जूलै रोजी निवडणूका होणार

## निवडणूकीचा कार्यक्रम घोषित होताच लगेचच उमेदवारी अर्ज स्विकारण्यास प्रारंभ

**परभणी ,/प्रतिनिधी:-** परभणी व हिंगोली या दोन जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीचा कार्यक्रम बुधवार १७ जून रोजी जाहीर होणार असून संचालकांच्या एकूण २१ जागांकरीताच्या या निवडणूकीकरीता १९ जूलै रोजी मतदान व २० जूलै रोजी मतमोजणी होणार आहे.




जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूका निर्धारित वेळेवर होणार का? या विषयी या दोन्ही जिल्ह्यात तर्क-वितर्क व्यक्त होत होते. विशेषतः जिल्हा बँकेंतर्गत संचालक मंडळाची कारकिर्द संपुष्टात आल्या बरोबर सहकार खात्याने केलेल्या प्रशासकाच्या नियुक्तीने निवडणूक लांबणारच अशी चिन्हे दिसत होती. परंतु, या निवडणूकीच्या दृष्टीने सहकार खात्याने मतदार याद्या निश्चित करण्या संदर्भात सुरु केलेल्या हालचाली व त्या मतदार याद्यांना दिलेल्या मुर्त स्वरुपाने, बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूका वेळेवरच होतील, असेही संकेत दिसू लागले होते.

या पार्श्वभूमीवरच बँकेवरील प्रशासक हटविण्याचा, पाठोपाठ निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या दृष्टीकोनातून सहकार खात्याने जोरदार हालचाली सुरु करीत निवडणूका वेळेवर होतील, असे स्पष्ट संकेत दिले. त्यामुळे या विषयीच्या तर्क-वितर्कास पूर्णविराम मिळाला अन् या दोन्ही जिल्ह्यातील राजकीय व सहकार खात्याद्वारे निवडणूकीच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु झाली.

गेल्या आठ दिवसांपासून या निवडणूकीचा कार्यक्रम आज ना उद्या जाहीर होईल, असे अपेक्षितच होते. त्याप्रमाणेच सहकार खात्याने बुधवार १७ जून रोजी जिल्हा बँकेच्या संचालकांच्या २१ जागांकरीता निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारीच संचालक मंडळाच्या या निवडणूकीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर होणार आहे. त्या पाठोपाठ त्याच दिवशी म्हणजे उद्यापासून २३ जून पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करुन घेतले जाणार आहे. या उमेदवारी अर्जांची छानणी, त्या पाठोपाठ उमेदवारी अर्ज माघारीकरीता अंतीम मुदतीचा कार्यक्रम आटोपल्या पाठोपाठ संचालकांच्या २१ जागांकरीता १९ जूलै रोजी मतदान होणार आहे. २० जूलै रोजी लगेचच मतमोजणीही होणार आहे.

दरम्यान, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीचा बिगूल वाजल्या बरोबर या दोन्ही जिल्ह्यातील राजकीय क्षेत्रातील हालचाली अधिक गतीमान होतील, हे स्पष्ट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या म्हणजे विधान परिषदेकरीता निवडणूकीचा कार्यक्रम यापूर्वीच जाहीर झाला आहे. त्याप्रमाणे १८ जून रोजी मतदान होणार आहे. त्या निवडणूकीच्या दृष्टीनेही दोन्ही जिल्ह्याच्या राजकीय क्षेत्रात पडद्याआड व पडद्यावर मोठ्या प्रमाणावर मोर्चेबांधणी सुरु आहे. त्यामुळेच या संवेदनशील अशा वातावरणातच जिल्हा बँकेच्या निवडणूका होऊ घातल्या आहेत.

## सावकारी करणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याची भाजपाची पोलिस प्रशासनाकडे मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** दिनांक - १५ जून रोजी मानवत पो.स्टेचे पोलीस निरीक्षक यांना भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य अनंत गोलाईत ( गहिलोत ) यांनी निवेदन देऊन सावकारी व जमीन हडप करणाऱ्यावर सावकारी बरोबरच फौजदारी गून्हा नोंदविण्याची प्राचार्य अनंत गोलाईत यांनी केली मागणी.

शहरातील वाढती गून्हेगारी, कब्जेबाजी, सावकारी, गूंदागर्दी रोखण्याची मागणी एका निवेदना द्वारे भाजपाचे उप जिल्हा उध्यक्ष प्राचार्य अनंत गोलाईत यांनी मानवत पोलिस प्रशासनाकडे केली. त्यामुळे शहरात खळबळ उडाली.

समाजातील गुंड, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ति कडून मानवत शहरासह तालूक्यात शांतता भंग होण्याची शक्यता असून ते मोठ्या प्रमाणात अवैध सावकारी, अवैध दारू विक्री, प्लॉट व जमिनी कब्जा करण्याचे जाळे मोठ्या प्रमाणात होत आहे.

## बारहाते हॉस्पिटलमध्ये कर्मचाऱ्यास मारहाण; जीवे मारण्याची धमकी : आरोपीविरुद्ध मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**मानवत,/प्रतिनिधी :** : येथील बारहाते हॉस्पिटलमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यास शिवीगाळ करून मारहाण तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट पसरली असून डॉक्टर असोसिएशनने आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

याप्रकरणी गोपाळ मुरलीधर पिंपळे (वय २६) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते मागील आठ वर्षांपासून बारहाते हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. १५ जून रोजी दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास ते दवाखान्यात काम करत असताना भिमसिंग ठाकूर हा एक्स-रे काढण्यासाठी आला. त्यावेळी पिंपळे यांनी त्यांना डॉक्टरांनी दिलेले प्रिस्क्रिप्शन दाखविण्यास व आवश्यक शुल्क भरण्यास सांगितले. तसेच डॉक्टर आल्यानंतर अहवाल देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. यावरून संतप्त झालेल्या ठाकूर याने मी गावचा डॉन आहे, मला पैसे का मागितले? असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच दवाखाना फोडून टाकण्याची व जाळून टाकण्याची धमकी देत पिंपळे यांची कॉलर पकडून त्यांच्या कानशिलात लगावल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

घटनेच्या वेळी दवाखान्यात अनेक महिला रुग्ण उपस्थित असल्याने कर्मचारी व इतरांनी मिळून संबंधितास बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तो खाली पडला. त्यानंतर शेजारील लाकडाच्या दुकानातून लाकूड उचलून तो पुन्हा दवाखान्याकडे धावून आला व आत घुसण्याचा प्रयत्न केला. यावेळी तुला आणि तुझ्या डॉक्टरला खतम करून टाकतो, अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मानवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, या घटनेचा निषेध करत मानवत तालुका डॉक्टर असोसिएशनच्या वतीने तहसीलदार कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. वैद्यकीय सेवा देणाऱ्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून आरोपीविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## कर्जमुक्ती व पीकविम्याच्या मागण्यांसाठी शेतकऱ्यांचे लाक्षणिक धरणे आंदोलन : जिल्हाभरातील शेतकरी परभणीत एकवटले

**परभणी,/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत शासन आणि प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मंगळवारी परभणीत एकदिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन केले. येथील आंदोलन मैदानावर जिल्ह्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने शेतकरी एकत्र येत कर्जमुक्ती, पीकविमा आणि नुकसानभरपाईसह विविध मागण्यांसाठी आवाज उठविला.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २०२५ पासून राज्य सरकारने पीकविमा योजनेतील अनेक जोखमीच्या बाबी वगळल्या असून त्या तात्काळ पूर्ववत करण्यात याव्यात. तसेच पीकविमा योजनेतील उंबरठा उत्पादन निश्चित करण्यासाठी जोखीम स्तर १०० टक्के करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

**शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी**

याशिवाय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी लागू करावी, जिल्ह्यातील २०२५ मध्ये पात्र ठरलेल्या महसूल मंडळांतील शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा नुकसानभरपाई अदा करावी, तसेच पीकविमा नुकसानभरपाई निश्चित करताना केवळ पीककापणी प्रयोगाधारित उत्पादनाचा आधार घ्यावा, अशा प्रमुख मागण्यांचाही समावेश निवेदनात करण्यात आला आहे. या निवेदनावर मंगेश देशमुख, प्रताप शिंदे, विश्वंभर गोरटे, लिंबाजी देवकते, हेमचंद्र शिंदे, लव शेळके, किरण चक्रपाणी, राजेंद्र जंबळेकर यांच्यासह अनेक शेतकरी प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान, आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांनी संपूर्ण कर्जमुक्ती लागू करा, पीकविमा योजनेचे रद्द केलेले ट्रिगर पुन्हा सुरू करा अशा घोषणा देत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलनामुळे परिसर काही काळ घोषणांनी दणाणून गेला. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला.

## परभणी पालकमंत्री बोर्डीकर यांच्या हस्ते भाजपा जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर शहरातील प्रभाग क्र.१२ नुरानी कॉलनी परिसरात भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक मोहम्मद अथर यांच्या भा ज पा जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन सोहळा परभणी पालकमंत्री मा.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी पालकमंत्री मेघना दीदी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत सांगितले की आपल्या वार्डात सकाळी फिरून नागरिकांच्या भेट घेऊन नागरिकांचे समस्या जाणून घेणे गरजेचे आहे तसेच जनसंपर्क कार्यालयात सर्वसामान्य नागरिका करिता स्वतः किंवा प्रतिनिधी बसविण्यात यावे. प्रभाग १२ च्या युवक नगरसेवकांनी कमी वयात राजकारणात प्रवेश केले व सर्वसामान्य नागरिकांचे काम करीत असल्याने पालकमंत्र्यांनी त्यांची प्रशंसा केली तसेच विधानसभा निवडणुकीत व नगरपरिषद निवडणुकीत जनतेला जे आश्वासने दिली आहे सर्वांची मदतीने पूर्ण करणार व शहरातील अनेक अडचणी आहे ते लवकरच सोडविण्यत येईल यावेळी पत्रकारांना संबोधित केले या भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय वार्ड क्र. १२ उद्घाटन सोहळ्यास साठी टीकाखान पठाण, मोहम्मद अथर,डॉ.पंडित दराडे, विलास भंडारी, मोहसीनखान पठाण, राजा वैष्णव, शिवाजी कदम बोर्डीकर, वजीर सर, मोहम्मद मझर, मुन्ना सर, शोएब जानीमिया, मिर्झा याहीयाबेग, संदीप लकडे,कल्याण देशमुख,बासुलाला पठाण,प्रदीप चौधरी,योगेश काशीकर, हाजीअझर, इद्रिस चाऊस, अशोक बुधवंत, समीर जानिमिया, मोहम्मद नूरभाई, आदी मान्यवरांची उपस्थित होती.

## बनावट भूखंड व्यवहार प्रकरणात नगर परिषदेच्या रोखपालाला जामीन : मृत व्यक्तीच्या नावाने बनावट आधार कार्ड तयार करून भूखंड हडपल्याचा आरोप; सत्र न्यायालयाचा दिलासा

**जिंतूर,/प्रतिनिधी :** मृत व्यक्तीच्या नावाने बनावट आधार कार्ड तयार करून सुमारे ४ हजार चौरस फुटांचा भूखंड हडपल्याच्या गाजत असलेल्या प्रकरणात अटक करण्यात आलेले जिंतूर नगर परिषदेचे रोखपाल (लिपिक) सिताराम रामभाऊ कसबे यांना परभणी येथील सत्र न्यायालयाने मंगळवारी नियमित जामीन मंजूर केला. न्यायालयाच्या या निर्णयामुळे कसबे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणी अकोला येथील सत्यजीत भास्करराव वानखेडे यांनी जिंतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, त्यांचे वडील तथा दिवंगत डॉ. भास्करराव वानखेडे यांच्या मालकीचा जालना रोडवरील सर्व्हे क्रमांक ११६/१/अ मधील ४ हजार चौरस फुटांचा भूखंड बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकावण्यात आला. डॉ. वानखेडे यांचे १ मे १९९८ रोजी निधन झाले असतानाही एका अज्ञात व्यक्तीने त्यांच्याच नावाने बनावट आधार कार्ड तयार केल्याचा आरोप आहे. या आधार कार्डावर संबंधित व्यक्तीचे वय ४४ वर्षे दाखविण्यात आले होते. त्यानंतर संबंधितांनी गुंठेवारी प्रमाणपत्र मिळवून २४ फेब्रुवारी २०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालयात भूखंडाचे खरेदीखत करून घेतल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या तक्रारीच्या आधारे जिंतूर पोलिसांनी १८ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासादरम्यान गुंठेवारी फाईलची पडताळणी करून त्यावर सही केल्याच्या आरोपावरून तत्कालीन लिपिक तथा रोखपाल सिताराम कसबे यांना २५ मे रोजी अटक करण्यात आली. पोलिसांनी त्यांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती; मात्र न्यायालयाने ती फेटाळून त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविले होते. त्यानंतर ते परभणी जिल्हा कारागृहात होते.

दरम्यान, कसबे यांनी ॲड. सुनिल बुधवंत यांच्यामार्फत सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. बचाव पक्षाने युक्तिवाद करताना कसबे यांचे नाव मूळ तक्रारीत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच आधार कार्डसारखे शासकीय ओळखपत्र समोर आल्यास त्याची सत्यता गृहीत धरून प्रशासकीय प्रक्रिया करणे हे कर्मचाऱ्याचे कर्तव्य असल्याचे सांगितले. आधार कार्डची सत्यता पडताळण्याची कोणतीही यंत्रणा नगर परिषद कर्मचाऱ्यांकडे उपलब्ध नसल्याचाही मुद्दा मांडण्यात आला. याशिवाय, संबंधित गुंठेवारी प्रमाणपत्रावर कसबे यांची सही नसल्याचे, तसेच त्यांच्या अटकेनंतर पालिकेच्या रोखपाल विभागाची चावी त्यांच्या पत्नींकडून प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आल्याने कागदपत्रांमध्ये फेरफार करण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. सर्व संबंधित कागदपत्रे पोलिसांनी जप्त केली असून अर्जदार तपासात सहकार्य करण्यास तयार असल्याचेही बचाव पक्षाने स्पष्ट केले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सत्र न्यायालयाने कसबे यांच्या अधिकृत भूमिकेचा, तपासातील स्थितीचा आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करून त्यांना नियमित जामीन मंजूर केला. या प्रकरणात ॲड. सुनिल बुधवंत यांना ॲड. नरेश गव्हाणे यांनी सहकार्य केले.